# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक २१५) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) बुधवार, दि.२६ ऑगस्ट २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## मराठी भाषा सक्तीविरोधात सरकारच्या निर्णयाला चार चालकांचे उच्च न्यायालयात आव्हान

मुंबई दि.२५ (प्रतिनिधी)- ऑटो-रिक्षा, टॅक्सी व अॅप-आधारित कॅब चालकांसाठी मराठी भाषेचे व्यावहारिक ज्ञान अनिवार्य करणाऱ्या महाराष्ट्र सरकारच्या १२ ऑगस्ट रोजीच्या अधिसूचनेला जनहित याचिकेद्वारे मंगळवारी मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले.

मोहम्मद कासिम अहमद यांच्यासह चार अॅप-आधारित कॅब चालकांनी ही याचिका दाखल केली आहे. याचिकेनुसार, ही अधिसूचना राज्यघटनेच्या कलम १४, १९ व २१ अन्वये मिळणाऱ्या व्यवसाय करण्याच्या त्यांच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन करते. याशिवाय, ही अधिसूचना मोटार वाहन कायद्याच्या तरतुदींशी विसंगत असल्याचा दावाही याचिकाकर्त्यांनी केला आहे. या कायद्यात वाहन चालवण्याचा परवाना मिळवण्यासाठी वा तो बाळगण्यासाठी कोणत्याही भाषेची अट घातलेली नाही, याकडे याचिकेत लक्ष वेधण्यात आले आहे. याचिकेत आर्थिकदृष्ट्या दुर्बल व स्थलांतरित चालकांवर या नियमामुळे होणाऱ्या परिणामांबद्दलही चिंता व्यक्त करण्यात आली आहे. मराठी भाषेची अट पूर्ण न केल्यास त्यांचे बॅज निलंबित होण्याचा व परवाने रद्द होण्याचा धोका निर्माण होऊ शकतो, अशी भीती याचिकाकर्त्यांनी व्यक्त केली आहे. राज्य परिवहन विभागाने ऑटो-रिक्षा व टॅक्सी चालकांच्या तपासणीदरम्यान मराठी भाषेच्या प्राविण्याबाबतची अट लागू केल्याच्या पार्श्वभूमीवर सरकारच्या निर्णयाला आव्हान देण्यात आले आहे.

# अमेरिकेने इराणवर कठोर निर्बंध लादले, इराणचेही तगडे प्रत्युत्तर

नवी दिल्ली दि.२५ (वृत्तसंस्था)- अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडून इराणवर आर्थिक निर्बंध लादण्यात आले आहेत. अमेरिकेचे वित्तमंत्री स्कॉट बेसेंट यांनी इराणच्या अर्थव्यवस्थेवर आघात करण्यासाठी घेण्यात आलेल्या निर्णयाला इकोनॉमिक डी-डे म्हटलं आहे.तर, इराणकडून ते याचा सामना करण्यास पूर्णपणे तयार असल्याचं म्हटलंय.अमेरिकेच्या या निर्णयाचा अप्रत्यक्ष परिणाम भारत आणि चीनवर होणार आहे. भारत थेट इराणकडून कच्चा तेलाची आयात करत नाही मात्र जागतिक तेल बाजारामार्फत भारतावर परिणाम होऊ शकतो. चीननं तेल खरेदीसाठी पर्याय शोधल्यास भारताचा क्रूड ऑईलचा खर्च, मालवाहतूक शुल्क आणि रुपयावर परिणाम होऊ शकतो.

एनर्जी इंटेलिजन्स फर्म केप्लरनुसार भारत थेट इराणकडून थेट क्रूड ऑईल खरेदी करत नाही,यामुळं भारतावरील परिणाम मर्यादित असू शकतो. अमेरिकेनं इराणवर निर्बंध लादल्यानं त्याचा थेट फटका चीनला बसणार आहे. चीन दरमहा इराणकडून ५ ते ८ बॅरल प्रति महिना खरेदी करते. अमेरिकेच्या दबावामुळं चीनला दुसऱ्या देशांकडून तेल खेदी करावं लागेल. भारत ज्या मार्केटमधून तेल खरेदी करतो, तिथं चीनचा प्रवेश होऊ शकतो, यामुळं स्पर्धा वाढेल आणि त्यामुळं क्रूड ऑईलच्या दरात वाढ होऊ शकते. यामुळं भारताचा क्रूड ऑईलच्या खरेदीचा खर्च वाढू शकतो.

भारताला एकूण गरजेच्या ५० टक्के कच्चे तेल रशियाकडून खरेदी करावं लागत आहे. रशियाकडून त्यांच्या क्षमतेच्या तुलनेत जितका अधिक पुरवठा भारताला केला जाईल तितका केला जात आहे. आंतरराष्ट्रीय तेल बाजारात मागणी आणि स्पर्धा वाढल्यानं



रशियाकडून तेल खरेदीवर दिली जाणारी सवलत देखील रद्द होऊ शकते. याचा फटका भारतीय तेल रिफायनऱ्यांना बसू शकतो.

आखाती देशांमधील भू राजनैतिक संघर्षामुळं कच्चा तेलासोबत मालवाहतुकीचा खर्च आणि विम्याचा खर्च देखील वाढला आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या जहाजांच्या विम्याचे प्रीमिअम महागले आहेत.

भारताला एकूण गरजेच्या ९० टक्के तेल आयात करावं लागतं. क्रूड ऑईलच्या आयातीचा खर्च वाढल्यास डॉलरच्या तुलनेत रुपया कमजोर होऊ शकतो. वाहतूक आणि शिपींग महागल्यान पेट्रोल, डिझेल, घरगुती गॅस आणि एटीएफ आणि उत्पादनासह अनेक गोष्टी महागण्याची शक्यता आहे.

अमेरिकेनं इराणवर निर्बंध लादले असले तरी त्याचा परिणाम थेट भारत आणि इराणच्या द्वीपक्षीय व्यापारावर होणार नाही. २०१८ मध्ये अमेरिकनं इराणवर निर्बंध लादल्यानंतर भारतानं मे २०१९ पासून तेल खरेदी बंद केलेली आहे.

भारताकडून इराणला बासमती तांदूळ निर्यात केला जातो. त्यामुळं भारताच्या तांदूळ निर्यातदारांना अडचण येऊ शकते. अमेरिकेनं इराणवर लादलेल्या निर्णयाचा थेट फटका भारताच्या तेल आयातीला बसणार नसला तरी त्याचा अप्रत्यक्ष परिणाम भारताच्या तेल आयातीच्या खर्च वाढण्यात किंवा देशात महागाई वाढण्यात होऊ शकतो.

# शासकीय आदिवासी वसतिगृहात प्रवेशासाठी वयोमर्यादेची अट अखेर रद्द

### ५ ऑगस्टचा शासन निर्णय आणि १४ ऑगस्टची सुधारित नियमावलीही मागे!

मुंबई दि.२५ (प्रतिनिधी)- आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेला प्रचंड रोष, त्यानंतर लोकप्रतिनिधींकडून प्राप्त झालेल्या सूचना व हरकतींचा विचार करून शासकीय आदिवासी वसतिगृहातील प्रवेशासाठी वयोमर्यादेची अट घालणारा शासन निर्णय आणि त्यानुषंगाने जारी करण्यात आलेली एकत्रित सुधारित नियमावलीही रद्द करण्यात आली आहे, अशी माहिती आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी दिली. विशेष म्हणजे पुण्यात झालेल्या काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या 'छात्रों की गुंज' या कार्यक्रमात एका आदिवासी मुलीने धाडसाने या प्रश्नावर आवाज उठवला होता. तर राज्यात ठिकठिकाणी आदिवासी तरूणांनी आंदोलने केली होती.

राज्य सरकारने ५ ऑगस्ट २०२६ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयान्वये शासकीय आदिवासी वसतिगृहात प्रवेशासाठी वयोमर्यादेच्या अटी लागू केल्या होत्या. या शासन निर्णयानुसार वसतिगृह प्रवेशासाठी कमाल २६ वर्षे वयाची अट निश्चित करण्यात आली होती. त्यावर विद्यार्थ्यांनी आक्षेप घेत आंदोलने केल्यानंतर १४ ऑगस्ट २०२६ रोजी जारी करण्यात आलेल्या सुधारित नियमावलीत शासकीय आदिवासी वसतिगृहातील प्रवेशासाठी वयाची कमाल मर्यादा ३० वर्षे निश्चित करण्यात आली होती.

त्यावरही आदिवासी विद्यार्थ्यांनी आक्षेप घेतला. वयाची अट घालून आम्हाला थांबवायचे आहे का? असा थेट सवालच आदिवासी विद्यार्थी सरकारला करू लागले होते. विशेष म्हणजे २२ ऑगस्ट रोजी काँग्रेस नेते राहुल गांधी यांचा पुण्यात 'छात्रों की गुंज' हा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात एका आदिवासी मुलीने शासकीय आदिवासी वसतिगृहातील समस्या आणि विद्यार्थिनींना (पान ४ वर)

## 'आरक्षण हटाव'वरून वडेट्टीवारांची भाजपवर टीकेची झोड

नागपूर दि.२५ (प्रतिनिधी)- 'आरक्षण हटाओ'च्या मुद्द्यावरून काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी भाजपवर जोरदार निशाणा साधला. भाजपमध्येच काही नेते आरक्षण संपवण्याची भाषा करत असतील, तर केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी संबंधितांची नावे जाहीर करावीत, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली. आरक्षणाच्या मुद्द्यावर भाजपची नेमकी भूमिका काय आहे, हे स्पष्ट करण्याचे आव्हानही त्यांनी दिले. नागपूर येथे आयोजित पत्रकार परिषदेत वडेट्टीवार यांनी आरक्षण, आदिवासी विद्यार्थ्यांच्या समस्या, तुकाराम मुंढे यांच्याशी संबंधित निर्णय, राहुल गांधींचा नागपूर दौरा आणि राज्यातील विविध राजकीय मुद्द्यांवर सरकारवर टीका केली.

आरक्षणाच्या मुद्द्यावर बोलताना वडेट्टीवार म्हणाले की, काँग्रेस आरक्षणाच्या संरक्षणासाठी ठामपणे उभी आहे. भाजपमधीलच काही लोक आरक्षण हटवण्याची भाषा करत असल्याचा आरोप त्यांनी केला. त्यामुळे राजनाथ सिंह यांनी केवळ सर्वसाधारण वक्तव्य न करता आरक्षण बंद करण्याची भाषा कोण करत आहे, त्यांची नावे जाहीर करावीत, असे ते म्हणाले. "आरक्षण आम्ही संपवणार नाही. मग आरक्षण बंद करण्याची भाषा कोण करत आहे? (पान ४ वर)

## टीएमसीच्या २० बंडखोर खासदारांना सर्वोच्च न्यायालयाने बजावली नोटीस

नवी दिल्ली दि.२५ (वृत्तसंस्था)- पश्चिम बंगालमधील विधानसभेच्या निवडणुकीनंतर मोठ्या राजकीय घडामोडी घडल्याचं पाहायला मिळालं होतं. विधानसभेच्या निवडणुकीत तृणमूल काँग्रेसचा पराभव झाला आणि त्यानंतर काही दिवसांतच तब्बल ५९ आमदार आणि २० खासदार फुटले. त्यामुळे ममता बॅनर्जी यांना मोठा धक्का बसला. तेव्हापासून बंडखोर खासदार व बंडखोर आमदार आणि ममता बॅनर्जी यांच्यात आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत.

या सर्व घडामोडी सुरू असतानाच आता एक मोठी बातमी समोर आली आहे. तृणमूल काँग्रेसच्या २० बंडखोर खासदारांना सर्वोच्च न्यायालयाने नोटीस बजावल्याची माहिती समोर आली आहे. तृणमूल काँग्रेसचे नेते तथा खासदार अभिषेक बॅनर्जी यांनी २० बंडखोर खासदारांच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी २० बंडखोर खासदारांना नोटीस बजावली.

लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याकडे प्रलंबित असलेल्या अपात्रतेच्या याचिकेवर त्वरित निर्णय घेण्याबाबत न्यायालयाने निर्देश द्यावेत, अशी मागणी अभिषेक बॅनर्जी यांनी केली आहे. मात्र, या याचिकेत पहिले प्रतिवादी म्हणून नाव असतानाही ओम बिर्ला यांना नोटीस बजावण्यात आलेली नाही. अभिषेक बॅनर्जी यांनी दाखल केलेल्या याचिकेसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने आता २० बंडखोर खासदारांकडून स्पष्टीकरण मागवलं आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे. न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची व न्यायमूर्ती व्ही. मोहना यांचा समावेश असलेल्या खंडपीठाने या याचिकेवर सुनावणी केली. न्यायमूर्ती बागची यांनी म्हटलं की, "आम्हाला या प्रकरणामध्ये एखाद्या घटनात्मक प्राधिकरणाविरुद्ध कोणताही आदेश पारित करायचा नाही, तर ती प्रक्रिया वेळेत पूर्ण होईल याची खात्री करायची आहे. हीच सर्वात महत्त्वाची बाब आहे. हा प्रश्न केवळ नोटिसा बजावण्याबाबत नसून ठराविक कालमर्यादेत कार्यवाही पूर्ण करण्याबाबत आहे."

अभिषेक बॅनर्जी यांच्या याचिकेत प्रतिवादी म्हणून नमूद करण्यात आलेल्या २० खासदारांमध्ये सायोनी घोष, काकोली घोष दस्तीदार, सुदीप बंडोपाध्याय, शताब्दी रॉय, प्रसून बॅनर्जी, अरूप चक्रवर्ती, दीपक देव अधिकारी आणि युसूफ पठाण यांच्यासह आदींचा समावेश आहे. या २० बंडखोर खासदारांच्या अपात्रतेबाबत निर्णय घेण्यास होत असलेल्या विलंबाला या याचिकेद्वारे आव्हान देण्यात आलेलं आहे.

## अंगणवाडीत आहाराच्या गुणवत्तेबाबत तडजोड नाही; व्हायरल व्हिडिओनंतर मंत्री आदिती तटकरेंचे निर्देश

मुंबई दि.२५ (प्रतिनिधी)- राज्यभरातील अंगणवाड्यांमध्ये बालकांसाठी देण्यात येणारा शासकीय पोषण आहार निकृष्ट असल्याची ओरड सातत्याने होत असते. मात्र, पुणे जिल्ह्यातील एका अंगणवाडी सेविकेनेच विद्यार्थ्यांसाठी दिला जाणारा वाटाणा किती निकृष्ट आहे, हे व्हिडिओच्या माध्यमातून सांगितले होते. त्यानंतर, संबंधित अंगणवाडीसेविकाचे निलंबन करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला होता. आता, महिला व बालकल्याण विभागाने बालकांच्या पोषणाला सर्वोच्च प्राधान्य असल्याचे सांगत अंगणवाड्यांमधील पोषण आहाराची ४८ तासांत तपासणी करा, असे निर्देशच मंत्री आदिती तटकरे यांनी दिले आहेत.

९ ते १० शिट्या काढूनही न शिजणारा पांढरा वाटाणा आणि शिजवूनही कच्चा राहणारा भरडा आम्ही लहान मुलांना कसा खाऊ घालायचा? असा उद्विग्न सवाल एका अंगणवाडी सेविकेने उपस्थित केला होता. अंगणवाडी सेविका देवयानी पारधी यांनी आपल्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर एक व्हिडिओ शेअर करत अन्न आणि औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांना या निकृष्ट अन्नावर तात्काळ बंदी घालण्याचे आवाहन केले होते. त्यानंतर, त्यांच्यावरच प्रशासनाकडून (पान ४ वर)

## दोन महिन्यांच्या आत साखरेवर प्रक्रिया करुन तिची विक्री करणे अनिवार्य

### साखरेची साठेबाजी रोखण्यासाठी सरकारकडून नियमांमध्ये सुधारणा

नवी दिल्ली दि.२५ (वृत्तसंस्था)- साखरेच्या दरात मोठी वाढ झाल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. वाढत्या साखरेच्या दरामुळं ग्राहकांच्या खिशाला मोठी झळ बसत आहे. दरम्यान, साखरेच्या दरावर नियंत्रण मिळवण्यासाठी सरकार विविध उपाययोजना करत आहे. सरकारनं १० लाख टन कच्ची साखर आयात करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचबरोबर आणखी एका महत्वाच्या नियमामध्ये सरकारनं बदल केला आहे. साखरेची साठेबाजी रोखण्यासाठी सरकारने कच्च्या साखरेच्या आयातीच्या नियमांमध्ये सुधारणा केली आहे. दोन महिन्यांच्या आत साखरेवर प्रक्रिया करुन तिची विक्री करणे अनिवार्य केले आहे. यामुळं वाढणाऱ्या दरांमध्ये काही प्रमाणात शिथीलता येऊ शकते.

सणासुदीच्या दिवसांपूर्वी साखरेच्या वाढत्या किमतींवर नियंत्रण मिळवण्यासाठी सरकारने कठोर पाऊल उचलले असून कच्च्या साखरेच्या आयातीशी संबंधित नियमांमध्ये सुधारणा केली आहे. दोन महिन्यांच्या आत साखरेवर प्रक्रिया करुन तिची विक्री करणे अनिवार्य केले आहे.

साखरेच्या वाढत्या किमतीच्या पार्श्वभूमीवर, सरकारने सोमवारी आयातीच्या अटींमध्ये सुधारणा केली आहे. यानुसार, टॅरिफ रेट्स कोट्याअंतर्गत आयात केलेल्या कच्च्या साखरेचे दोन महिन्यांच्या आत पांढऱ्या/शुद्ध साखरेत रूपांतर करून देशांतर्गत बाजारात विक्री करणे बंधनकारक करण्यात आले आहे. पूर्वीच्या नियमांनुसार, आयात केलेल्या कच्च्या साखरेवर वाजवी कालावधीत आणि वेळेच्या खूप आधी प्रक्रिया करणे आवश्यक होते, जेणेकरून ती ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत देशांतर्गत बाजारात विकली जाऊ शकेल. सुधारित नियमांनुसार आता प्रक्रिया आणि विक्रीसाठी दोन महिन्यांची मुदत अनिवार्य करण्यात आली आहे. कच्च्या साखरेची साठेबाजी रोखणे आणि ग्राहकांना आयातीपासून लवकरात लवकर दिलासा देणे, हा यामागील उद्देश आहे. सरकारच्या या निर्णयामुळे साखरेच्या वाढत्या किमतींवर नियंत्रण मिळवण्याची आशा निर्माण झाली आहे.

## देवेंद्र फडणवीसांची दिल्लीला जाण्याची आवराआवर, कुंभमेळ्याच्या निधीत २७ कोटींचा भ्रष्टाचार? संजय राऊतांचा निशाणा

मुंबई दि.२५ (प्रतिनिधी)- नवी दिल्ली येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी राज्यातील महायुती सरकार, भाजप आणि थेट सर्वोच्च न्यायालयाच्या कार्यपद्धतीवर सडकून टीका केली आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे लवकरच दिल्लीला रवाना होणार असून, त्याआधी ते राज्यातील प्रलंबित कामे उरकून आपली माणसे महत्त्वाच्या पदांवर बसवण्याची आवराआवर करत असल्याचा मोठा दावा राऊत यांनी केला आहे. यासोबतच नाशिकच्या कुंभमेळ्यातील भ्रष्टाचार, विमानतळांचे खासगीकरण आणि आदिवासींच्या प्रश्नांवरून त्यांनी सरकारला धारेवर धरले.

महायुतीच्या बैठकीवर भाष्य करताना राऊत म्हणाले की, "गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेले निधीवाटप, राज्यपाल नियुक्त जागा आणि महामंडळांच्या नियुक्त्या मार्गी लावण्याची लगबग सध्या सुरू आहे. देवेंद्र फडणवीस हे दिल्लीला जाण्याच्या तयारीत असून, त्याआधी ते आवराआवर करत आहेत. दिल्लीला रवाना होण्यापूर्वी आपली माणसे योग्य ठिकाणी बसवून जाण्याची त्यांची खेळी आहे."

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्न वराळे यांनी कुंभमेळ्यावरील अवाढव्य खर्चावरून केलेल्या विधानाचे राऊत यांनी समर्थन केले. राऊत म्हणाले, "कुंभमेळ्याचे बजेट ३८,००० कोटींवरून थेट ७५,००० कोटींपर्यंत पोहोचले आहे. मात्र, हा पैसा नाशिकच्या (पान ४ वर)

## साखरेच्या साठेबाजीवर राज्य पुरवठा विभागाची करडी नजर; कारवाई होणार

मुंबई दि.२५ (प्रतिनिधी)- देशभरात साखरेचे वाढलेले भाव सर्वसामान्यांच्या किचनचं बजेट कोलमडणारं आणि सणाच्या गोडव्यात कडवटपणा निर्माण करणारे बनले आहेत. महिनाभरातच साखरेच्या भावात तब्बल ३० रुपयांपेक्षा अधिक दरवाढ झाल्याने साखरेचे दर ७० रुपयांच्या पुढे गेले आहेत. त्याच पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने मोठ्या प्रमाणात साखर आयात करण्याचा निर्णय घेतला आहे. तर, व्यापाऱ्यांकडून साठेबाजीला आळा घालण्यासाठी काही कठोर पाऊले उचलण्यात येत आहेत. अन्न व पुरवठा विभागाने आदेश जारी करत, ४००० क्विंटल पेक्षा अधिकच्या साखरेचा साठा न करण्याचे निर्देश दिले आहेत, अन्यथा कारवाई केली जाणार आहे.

केंद्र शासनाने अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ च्या कलम ३ तसेच साखर (नियंत्रण) आदेश, २०२५ मधील खंड ७ व खंड १६ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून साखरेच्या साठा मर्यादेबाबत २८ जुलै २०२६ रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. सदर साखर साठ्यावरील निर्बंधाचा आदेश ३० नोव्हेंबर, २०२६ पर्यंत लागू राहील असे नमूद केले आहे. या आदेशप्रमाणे ४००० क्विंटलपेक्षा अधिक साखरेचा साठा करता येणार नाही.

कोणताही साखर विक्रेता साखरेचा साठा प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांपेक्षा अधिक कालावधीपर्यंत धारण करू शकणार नाही. तसेच कोणत्याही वेळी व कोणत्याही ठिकाणी ४,००० क्विंटलपेक्षा अधिक साखरेचा साठा ठेवता येणार नाही. सदर निर्बंध शासनाच्या खात्यावरील साठ्यास तसेच राज्य शासनाने नामनिर्देशित केलेल्या विक्रेत्यांमार्फत सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत रास्त भाव दुकानांमध्ये वितरणासाठी ठेवण्यात आलेल्या साठ्यास लागू राहणार नाहीत. तसेच, सर्व साखर विक्रेत्यांनी अन्न व सार्वजनिक वितरण विभागाच्या पोर्टलवर साखरेच्या साठ्याची माहिती घोषित करून ती नियमितपणे अद्ययावत ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे.

अन्न व पुरवठा विभागाकडून सदर अधिसूचना १ ऑगस्ट २०२६ पासून लागू होऊन ३० नोव्हेंबर पर्यंत अंमलात राहणार आहे. सदर आदेशाची सक्त अंमलबजावणी करण्यात यावी आणि साठेबाजी करणाऱ्या व्यापाऱ्यांविरुद्ध (पान ४ वर)

## महायुतीत स्थानिक पातळीवर धुसफूस, देवेंद्र फडणवीसांचा कठोर पवित्रा, प्रमुख नेत्यांना वॉर्निंग

मुंबई दि.२५ (प्रतिनिधी)- महायुतीतील अंतर्गत वाद आणि मतभेद मिटवण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या बैठकीत विविध महत्त्वाच्या मुद्द्यांवर सखोल चर्चा झाली. राज्यातील रखडलेली महामंडळे आणि जिल्हा नियोजन समितीच्या निधी वाटपाचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. वारंवार सूचना देऊनही महायुतीमधील पक्षांमध्ये स्थानिक स्तरावर सातत्याने धुसफूस सुरु असल्याने स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व प्रमुख नेत्यांना सक्त ताकीद दिली आहे.

पहिल्यांदाच मुख्यमंत्री फडणवीसांनी महायुतीच्या समन्वय समितीची बैठक घेतली. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत महायुती समन्वय समितीची बैठक पार पडली. गेल्या काही दिवसांत अशा काही घडामोडी घडल्या. ज्यावरून महायुतीत समन्वय आहे का, असा सवाल उपस्थित झाला होता. त्यामुळे समन्वय समितीच्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी मार्गदर्शन केलं. या बैठकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, हसन मुश्रीफ, गिरीश महाजन, संजय खोडके, चंद्रशेखर बावनकुळे शंभुराज देसाई, छगन भुजबळ बैठकीला उपस्थित होते.

महायुतीत समन्वय राखण्याबाबत बैठकीत चर्चा झाल्याची माहिती मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. तसेच स्थानिक स्तरावर महायुतीमध्ये पूर्ण समन्वय राखण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. महायुतीतील कोणत्याही आमदार किंवा खासदाराने एकमेकांच्या नेत्यांवर अथवा पक्षांवर सार्वजनिक टीका करू नये, अशा कडक सूचना सर्वांना देण्यात आल्या आहेत अशी माहिती चंद्रशेखर बावनकुळे यांनी बैठकीनंतर दिली.

ज्या जिल्ह्यांमध्ये निधी वाटपावरून महायुतीतील घटक पक्षांमध्ये मतभेद उद्भवतील, तिथे सर्वप्रथम विभागीय आयुक्तांमार्फत तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जाईल. तिथेही तोडगा न निघाल्यास समन्वय समितीच्या (पान ४ वर)

## रेशनचा तांदूळ आमची कोंबडी पण खात नाही; बुलढाण्यात लाभार्थी संतप्त

बुलढाणा दि.२५ (प्रतिनिधी)- सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत (रेशन) मिळणाऱ्या निकृष्ट दर्जाच्या धान्यामुळे त्रस्त झालेल्या लाभार्थ्यांच्या संतापाचा उद्रेक चिखली येथे पाहायला मिळाला. रेशन दुकानातून मिळालेला अत्यंत निकृष्ट दर्जाचा तांदूळ हातात घेऊन संतप्त लाभार्थ्यांनी थेट चिखली तहसील कार्यालयात धाव घेतली आणि तहसीलदारांच्या दालनासमोरच तो ओतून प्रशासनाचा तीव्र निषेध नोंदवला. "या तांदळाची खिचडी तहसीलदारांनी त्यांच्या बायका-पोरांसोबत खावी, मग आम्हीसुद्धा खाऊ! आमच्या घरची कोंबडीसुद्धा हा तांदूळ खात नाही," अशा अत्यंत तिखट शब्दांत लाभार्थ्यांनी आपला रोष व्यक्त केला. या आंदोलनामुळे महसूल आणि पुरवठा विभागाच्या भोंगळ कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानांतून वितरित होणारे धान्य खाण्यायोग्य नसल्याच्या तक्रारी अनेक दिवसांपासून होत आहेत. चिखली शहरातील काही कुटुंबांना मिळालेला तांदूळ किडलेला, खराब आणि चुरियुक्त असल्याने संतप्त नागरिकांनी थेट तहसीलदारांचे दालन गाठले. धान्य हातात दाखवत लाभार्थ्यांनी अधिकाऱ्यांना सवाल केला, "अधिकारी लोक, त्यांच्या मुला-बाळांना आणि बायकोला हे धान्य खायला देतात का? ते या धान्याची वाट पाहतात का? जे धान्य जनावरे आणि कोंबड्याही खात नाहीत, ते माणसांच्या ताटात देऊन त्यांच्या आरोग्याशी खेळ सुरू आहे का?" तांदळासोबतच रेशनवर मिळणाऱ्या मक्याच्या वाटपावरही लाभार्थ्यांनी तीव्र आक्षेप घेतला. "तुम्ही मक्याचं वाटप का करताय? माणसांना जनावरं समजून देताय का? आपल्या देशात रोज मक्याची भाकरी किंवा जेवण कोण करतं? खायच्या लायक धान्य देऊ शकत नसाल तर ते वाटपच बंद करा आणि तुमचा मोठेपणा बंद करून ठेवा," असा थेट इशारा महिला लाभार्थ्यांनी दिला. आंदोलनकर्त्या लाभार्थ्यांनी तहसीलदारांना अनोखे आव्हान देत म्हटले, "माझ्याकडून तहसीलदार साहेबांना सहकुटुंब जेवणाचे आमंत्रण आहे. त्यांनी माझ्या घरी यावे, मी याच तांदळाची खिचडी त्यांना आणि त्यांच्या फॅमिलीला प्रेमाने खाऊ घालतो." चिखली तहसील कार्यालयासमोर घडलेल्या या प्रकारामुळे शासकीय अधिकारी आणि पुरवठा विभागासमोर खळबळ उडाली. प्रशासनाने या निकृष्ट धान्याची तात्काळ दखल घेऊन दोषींवर व रेशन दुकानदारांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

## चॉकलेटचे आमिष दाखवून तीन वर्षांच्या चिमुकलीवर अत्याचार; आरोपी फरार

नांदेड दि.२५ (प्रतिनिधी)- राज्यातील महिला आणि लहान मुलींवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असल्याचं दिसून येते आहे. नगरापूरच्या घटनेनं अवघा महाराष्ट्र हादरला होता, त्यानंतरही चिमुकल्यांवरील अत्याचाराच्या घटना पुढे येत आहेत. नांदेड जिल्ह्यातील लोहा तालुक्यातील सोनखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका तीन वर्षीय चिमकुलीवर अत्याचार केल्याचा संतापजनक घटना उघडकीस आली आहे. येथील एका गावात तीन वर्षांच्या चिमुकलीवर चॉकलेटचे आमिष दाखवून अत्याचार केल्याची घटना समोर आली. या प्रकरणी पीडित बालिकेच्या आईच्या फिर्यादीवरून सोनखेड पोलिसांनी मंगळवारी (२५ ऑगस्ट) पहाटे गुन्हा दाखल केला असून, फरार आरोपीचा कसून शोध सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी (२४ ऑगस्ट) सायंकाळी पीडित चिमुकली घरासमोरील अंगणात खेळत होती. त्याचवेळी शेजारी राहणाऱ्या नातेवाईक व्यक्तीने तिला चॉकलेट देण्याचे आमिष दाखवून सोबत नेले. साधारण २० ते २५ मिनिटांनंतर तो मुलीला पुन्हा घरी सोडून निघून गेला. मुलगी रडत असल्याचे तिच्या आईच्या लक्षात आले. त्यामुळे, आईने विचारपूस केली असता, संबंधित व्यक्तीने तिच्यासोबत गैरकृत्य केल्याचे तिने सांगितले. चिमुकली नात्याने त्या आरोपीला बाबा अशी हाक मारायची. मुलीला दुखापत झाल्याचे निदर्शनास येताच पालकांनी तिला तातडीने नांदेड येथील शासकीय रुग्णालयात (विष्णूपुरी) दाखल केले. सध्या तिच्यावर डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार सुरू असून तिची प्रकृती स्थिर असल्याची माहिती कुटुंबीयांनी दिली.

# अन्नाची ॲलर्जी : असहिष्णुता की संवेदनशीलता?

अनेकांना एखादा अन्नपदार्थ खाल्ल्यानंतर शिंका येणे, श्वास घेताना घरघर होणे, अंगावर पुरळ उठणे, पोट फुगणे, जुलाब, मळमळ, सांधेदुखी किंवा थकवा यांसारखी लक्षणे जाणवतात. अशा वेळी बहुतेक जण त्याला 'अन्न ॲलर्जी' समजतात. मात्र प्रत्येक वेळी ती ॲलर्जीच असेल असे नाही. काही वेळा ही अन्न असहिष्णुता, अन्न संवेदनशीलता किंवा सेलिअक रोगाची लक्षणे असू शकतात. या स्थितींचे स्वरूप आणि उपचार वेगवेगळे असल्याने त्यातील फरक समजून घेणे महत्त्वाचे आहे. अन्न असहिष्णुता अन्न असहिष्णुता म्हणजे शरीराला विशिष्ट अन्नपदार्थ नीट पचवता किंवा त्यावर प्रक्रिया करता न येणे. याचे सर्वाधिक परिचित उदाहरण म्हणजे लॅक्टोज असहिष्णुता. वय वाढत गेल्यानंतर अनेकांच्या शरीरात लॅक्टोज पचवण्यासाठी आवश्यक असलेले लॅक्टेज हे एन्झाइम कमी प्रमाणात तयार होते. त्यामुळे दुधातील लॅक्टोज पूर्णपणे पचत नाही आणि पोट फुगणे, गॅस, पोटदुखी किंवा जुलाब यांसारख्या तक्रारी निर्माण होतात. संशोधनानुसार, जगातील केवळ सुमारे ३५ टक्के लोकच बालपणानंतरही लॅक्टोज सहज पचवू शकतात. लॅक्टोज असहिष्णुता जीवघेणी नसली, तरी ती दैनंदिन जीवनात मोठा त्रास देऊ शकते. दुग्धजन्य पदार्थ कमी करणे किंवा टाळणे, तसेच डॉक्टरांच्या सल्ल्याने लॅक्टेज एन्झाइमची पूरक औषधे घेणे उपयुक्त ठरू शकते.

अन्न ॲलर्जी अन्न ॲलर्जी ही रोगप्रतिकारक शक्तीची अतितीव्र प्रतिक्रिया असते. शरीर एखाद्या निरुपद्रवी अन्नपदार्थालाही धोकादायक समजून त्याविरुद्ध प्रतिक्रिया देते. शेंगदाणे, समुद्री खाद्यपदार्थ, अंडी, दूध किंवा इतर काही अन्नपदार्थांमुळे काही व्यक्तींना श्वास घेण्यास त्रास, चेहरा किंवा घसा सुजणे, रक्तदाब अचानक कमी होणे किंवा ॲनाफिलॅक्सिससारखी जीवघेणी अवस्था निर्माण होऊ शकते. अशा वेळी तातडीने वैद्यकीय उपचार आवश्यक असतात. अन्न ॲलर्जी केवळ लहान मुलांनाच होते असे नाही. ती कोणत्याही वयात, अगदी प्रौढावस्थेतही प्रथमच उद्भवू शकते. त्यामुळे अशा लक्षणांकडे दुर्लक्ष करू नये. अन्न संवेदनशीलता अन्न संवेदनशीलता ही अधिकृत वैद्यकीय निदानाची संज्ञा नसली, तरी अनेक तज्ज्ञांच्या मते ती खसत्रꣳ-मध्यस्थ रोगप्रतिकारक प्रतिसादाशी संबंधित असू शकते. मात्र याविषयी अद्याप एकमत नाही. या स्थितीत लक्षणे लगेच दिसतीलच असे नाही. ती काही तासांनी किंवा काही दिवसांनीही जाणवू शकतात. यात विशेषत: पोटदुखी, पोट फ ुगणे, अतिसार, डोकेदुखी, थकवा, सांधेदुखी, त्वचेवर पुरळ, लक्ष केंद्रित करण्यात अडचण, चिंता अशी संभाव्य लक्षणे दिसतात. अनेक वेळा वगळणी आहार (एश्रळाळपरींळेप ऊळशीं) वापरून संवेदनशील अन्नपदार्थ शोधले जातात. खसत्रꣳ चाचण्यांच्या अचूकतेबाबत मात्र तज्ज्ञांमध्ये मतभेद आहेत.

लक्षात घ्या, एखादा अन्नपदार्थ खाल्ल्यानंतर वारंवार त्रास होत असल्यास स्वतः निदान करण्याऐवजी डॉक्टर किंवा ॲलर्जी तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. योग्य तपासणीनंतरच ॲलर्जी, असहिष्णुता किंवा संवेदनशीलता यातील नेमके कारण निश्चित करता येते.

# दहीहंडी हा खेळ कॉमनवेल्थ आणि ऑलिम्पिकमध्ये नेण्यासाठी राज्य शासन प्रयत्न करणार-मुख्यमंत्री



मुंबई दि.२५ (प्रतिनिधी)- गोविंदा हा महाराष्ट्राच्या संस्कृतीची आणि मुंबईची ओळख आहे. 'प्रो गोविंदा'च्या माध्यमातून हा खेळ संपूर्ण भारतासह जगात पोहोचला आहे. गोविंदाच्या या साहसी खेळाला अखिल भारतीय स्तरावर मान्यता मिळवून देत एशियाड, कॉमनवेल्थ आणि पुढे ऑलिम्पिकपर्यंत नेण्यासाठी राज्य शासन प्रयत्न करेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

प्रो गोविंदा लीग २०२६ सिझन ४ चा उद्घाटन सोहळा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत एसव्हीपी स्टेडियम, वरळी येथे पार पडला त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, मुंबई महानगरपालिकेच्या महापौर रितू तावडे, आमदार रणजीत पाटील, लीगचे अध्यक्ष पूर्वेश सरनाईक, श्रीमती शायना एन. सी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्याच्या सांस्कृतिक परंपरेचा अविभाज्य भाग असलेल्या दहीहंडी उत्सवाला आधुनिक आणि व्यावसायिक क्रीडा स्पर्धेचे स्वरूप देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेली प्रो गोविंदा लीग (पीजीएल) देशातील मानवी मनोरे रचण्याच्या खेळासाठीची पहिली व्यावसायिक लीग म्हणून ओळखली जाते. दहीहंडी हा केवळ उत्सव नसून समाजाला एकत्र आणणारा आणि सामाजिक अभिसरणाचा संदेश देणारा उपक्रम आहे. गोविंदांनी एकमेकांना आधार देत मानवी साखळी तयार करून हंडी फोडण्याची परंपरा जपली आहे. भगवान श्रीकृष्णांनी दिलेला 'संपूर्ण समाज एक आहे' हा संदेश या खेळातून अधोरेखित होतो. एकीच्या बळावर कोणत्याही संकटाचा सामना करता येतो आणि मोठे कार्य साध्य करता येते.

या खेळाला अखिल भारतीय स्तरावर ऑलिम्पिक असोसिएशन तसेच संबंधित क्रीडा संघटनांची मान्यता मिळवून देणे त्यानंतर हा खेळ एशियाड, कॉमनवेल्थ आणि अखेरीस ऑलिम्पिकपर्यंत नेण्याच्या दृष्टीने शासन सर्वोतोपरी सहकार्य करेल अशी ग्वाही मुख्यमंत्री यांनी दिली. यावेळी मुख्यमंत्री यांनी सर्व गोविंदा पथके, त्यांचे प्रशिक्षक तसेच गोविंदांना प्रोत्साहन देत शुभेच्छा दिल्या.

मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, दही – हंडी ( प्रो गोविंदा) खेळाला राज्य शासनाने साहसी खेळाचा दर्जा दिला आहे. तसेच शासन २०२३ पासून गोविंदांना विमा देत आहे. यावर्षी गोविंदांची संख्या वाढवून एक लाख ६० हजार गोविंदा ना विमा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यावेळी १६ संघ आणि ३२०० गोविंदांनी सहभाग घेतला असून, तीन दिवस या स्पर्धा सुरू रहाणार आहेत.

# ईद-ए-मिलाद : पैगंबरांचा संदेश आणि माणुसकीची आजची गरज

ईद-ए-मिलाद म्हणजे केवळ एका धार्मिक उत्सवाचा दिवस नाही, तर तो माणुसकीला म णुसकीची जाणीव करून देणारा दिवस आहे. पैगंबर हजरत मोहम्मद यांच्या जन्मस्मरणाचा हा दिवस त्यांच्या जीवनातील करुणा, समता, बंधुता, संयम, न्याय आणि शांततेच्या संदेशाचे स्मरण करून देतो. आज जग विज्ञान, तंत्रज्ञान आणि आर्थिक विकासाच्या बाबतीत प्रचंड पुढे गेले असले, तरी माणसाच्या मनातील द्वेष, हिंसा, असहिष्णुता आणि भेदभाव अद्याप संपलेला नाही. म्हणूनच ईद-ए-मिलादचा संदेश आज अधिक महत्त्वाचा ठरतो. धर्म माणसाला जोडण्यासाठी असतो; तो माणसामाणसांत भिंती उभ्या करण्यासाठी नसतो. श्रद्धा मनाला नम्र बनवत नसेल, तर त्या श्रद्धेच्या अर्थाचा पुनर्विचार करण्याची गरज आहे. ईद-ए-मिलादचा खरा अर्थही याच ठिकाणी सापडतो. माणसावर प्रेम करा, दुर्बलाच्या पाठीशी उभे राहा, अन्यायाला विरोध करा आणि समाजात शांतता व बंधुभाव निर्माण करा.




पैगंबर हजरत मोहम्मद यांच्या जीवनाकडे पाहिले तर त्यांच्या संदेशाच्या केंद्रस्थानी माणूस दिसतो. गरीब, अनाथ, विधवा, वंचित आणि दुर्बल घटकांप्रती संवेदनशीलता हा त्यांच्या शिकवणीचा महत्त्वाचा भाग होता. माणसाची प्रतिष्ठा त्याच्या संपत्तीने, वंशाने किंवा सामाजिक स्थानाने ठरत नाही, तर त्याच्या चारित्र्याने आणि कर्माने ठरते, हा विचार समाजाला समतेच्या दिशेने नेणारा आहे.

आजच्या समाजासमोर सर्वात मोठे आव्हान कोणते असेल, तर ते माणसामाणसांमधील वाढते अंतर. धर्माच्या नावावर संशय, जातीच्या नावावर तिरस्कार, राजकीय मतभेदांवरून वैर आणि सामाजिक माध्यमांवरील अफवांमुळे निर्माण होणारा द्वेष, ही लोकशाही समाजासाठी धोक्याची चिन्हे आहेत. अशा वातावरणात ईद-ए-मिलादचा संदेश केवळ एका समाजापुरता मर्यादित न ठेवता संपूर्ण मानवतेपर्यंत पोहोचविण्याची गरज आहे.

आज धार्मिक सणांचे स्वरूपही अनेकदा बदलताना दिसते. सण म्हणजे आनंद, श्रद्धा आणि परस्पर भेटीगाठी यापेक्षा शक्तिप्रदर्शन, मोठमोठे आवाज, दिखावा आणि सोशल मीडियावरील प्रदर्शन यापुरते मर्यादित होत असतील, तर आपण सणाच्या आत्म्यापासून दूर जात आहोत. कोणत्याही धर्माचा उत्सव माणसाच्या दुःखाकडे पाठ फिरवून पूर्ण होऊ शकत नाही. एखाद्या गरीबाच्या घरात अन्न पोहोचले, एखाद्या निराधाराला आधार मिळाला, एखाद्या आजारी व्यक्तीला मदत झाली, एखाद्या दुःखी मनाला दिलासा मिळाला, तरच धार्मिकतेला खरा अर्थ प्राप्त होतो. आज ईद-ए-मिलादच्या निमित्ताने समाजाने याच माणुसकीची मशाल पेटवण्याची गरज आहे.

आज जगात युद्धे सुरू आहेत. निष्पाप नागरिकांचे जीव जात आहेत. धर्म आणि वंशाच्या नावावर माणूस माणसाचा शत्रू बनत आहे. द्वेषाचे राजकारण अनेक ठिकाणी समाजाला अस्थिर करत आहे. अशा वेळी शांतता हा केवळ सुंदर शब्द न राहता तो सामाजिक व्यवहाराचा भाग झाला पाहिजे.

भारतासारख्या बहुधर्मी आणि बहुसांस्कृतिक देशात या संदेशाचे महत्त्व आणखी मोठे आहे. भारताची ताकदच विविधतेत आहे. मंदिरातील घंटानाद, मशिदीतील अजान, गुरुद्वारातील कीर्तन, चर्चमधील प्रार्थना आणि बौद्ध विहारातील शांतता, या सर्व आवाजांनी भारतीय संस्कृतीची समृद्ध वीण तयार केली आहे.

या विविधतेला संघर्षाचे कारण बनवणे म्हणजे भारताच्या आत्म्यालाच कमकुवत करणे होय. धर्म कोणताही असो, अश्रूंची भाषा एकच असते. भूक कोणत्याही धर्माची नसते. दुःखाला जात नसते. मृत्यूला पंथ नसतो आणि माणुसकीला सीमा नसते. म्हणूनच ईद-ए-मिलाद हा फक्त मुस्लिम बांधवांचा सण म्हणून पाहणे हा त्याच्या व्यापक मानवी संदेशाला मर्यादा घालण्यासारखे आहे. पैगंबरांच्या जीवनातील करुणा, प्रामाणिकपणा, न्याय आणि बंधुभावाचे मूल्य प्रत्येकाने आत्मसात करण्याची गरज आहे.

आज आपल्या समाजाला धार्मिकतेपेक्षा धर्मभावनेची शुद्धता अधिक आवश्यक आहे. धर्माच्या नावावर दुसऱ्याचा अपमान करणे ही धार्मिकता नाही. दुसऱ्याच्या श्रद्धेचा अवमान करणे ही श्रद्धेची ताकद नाही. आपल्या धर्मावर प्रेम करण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे, पण त्याच वेळी दुसऱ्याच्या धर्माचा सन्मान करण्याची जबाबदारीही प्रत्येकाची आहे. लोकशाहीमध्ये मतभेद असतीलच. विचार वेगळे असतीलच. श्रद्धा वेगळ्या असतीलच. पण मतभेदांचे रूपांतर मनभेदांत होऊ नये. असहमती ठेवता येते, शत्रुत्व ठेवण्याची गरज नसते. हे शिकवणे हीच आजच्या काळातील मोठी सामाजिक गरज आहे.

ईद-ए-मिलादच्या दिवशी मिरवणुका, सजावट आणि धार्मिक कार्यक्रम होतील. ते श्रद्धेचे अभिव्यक्तीस्वरूप आहे. मात्र या उत्सवातून समाजाला आणखी काही मिळाले पाहिजे. रक्तदान शिबिरे, गरिबांना अन्नधान्य, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, रुग्णांना मदत, अनाथ आणि वृद्धांना आधार, पर्यावरण संवर्धन अशा उपक्रमांतून सणाचे सामाजिक रूप अधिक प्रभावी होऊ शकते. कारण देवाच्या नावाने केलेली प्रार्थना ओठांवर असते, पण गरजूच्या मदतीला धावून जाणारी माणुसकी हृदयात असते.

आज तरुण पिढीसमोरही मोठे आव्हान आहे. सोशल मीडियावर एका क्षणात द्वेष पसरतो. अपूर्ण माहितीवरून निष्कर्ष काढले जातात. अफवा सत्यापेक्षा वेगाने पसरतात.

अशा वेळी तरुणांनी विवेक, संयम आणि सत्याची बाजू घेणे आवश्यक आहे. धर्माच्या नावाने कोणताही अपमानास्पद, द्वेषपूर्ण किंवा हिंसक संदेश पुढे पाठवण्यापूर्वी थांबणे हीदेखील सामाजिक जबाबदारी आहे. ईद-ए-मिलादचा खरा उत्सव मशिदीच्या भिंतींपलीकडे आणि मिरवणुकीच्या रस्त्यापलीकडे गेला पाहिजे. तो गरीबाच्या झोपडीपर्यंत, अनाथाच्या डोळ्यांपर्यंत, विधवेच्या दुःखापर्यंत, शेतकऱ्याच्या संघर्षापर्यंत आणि बेरोजगार तरुणाच्या अस्वस्थतेपर्यंत पोहोचला पाहिजे. पैगंबरांच्या जन्मस्मरणाचा दिवस आपल्याला एक साधा पण कठोर प्रश्न विचारतो, आपण श्रद्धाळू झालो, पण आपण खरे माणूस झालो का? जर आपल्या प्रार्थनेनंतरही दुसऱ्याच्या वेदना आपल्याला जाणवत नसतील, तर आपली प्रार्थना अपुरी आहे. जर आपल्या धार्मिक उत्सवात शेजाऱ्याच्या दुःखाला जागा नसेल, तर आपल्या उत्सवाचा अर्थ अपुरा आहे. आणि जर धर्म आपल्याला नम्र, न्यायप्रिय, दयाळू आणि संवेदनशील बनवत नसेल, तर धर्माच्या नावापेक्षा त्याच्या आचरणाकडे पाहण्याची वेळ आली आहे.

ईद-ए-मिलादच्या निमित्ताने आज एक संकल्प करू या, धर्म जपूया, पण माणूसही जपू या, श्रद्धा जपू या, पण संवेदनशीलताही जपू या, आपली ओळख जपू या, पण दुसऱ्याच्या अस्तित्वाचा सन्मानही करू या. कारण शेवटी कोणत्याही धर्माची खरी परीक्षा मंदिरात, म शिदीत किंवा प्रार्थनास्थळी होत नाही, तर ती होते माणूस दुसऱ्या माणसाशी कसा वागतो यामध्ये. ईद-ए-मिलादचा चंद्र आकाशात उगवताना त्याचा प्रकाश एका समाजापुरता मर्यादित राहत नाही. तो सर्वांच्या अंगणात पडतो. त्याचप्रमाणे पैगंबरांचा माणुसकीचा संदेशही एका धर्मापुरता मर्यादित राहू नये.

द्वेषाच्या काळोखात माणुसकीचा दिवा पेटवणे, अन्यायाच्या गर्दीत न्यायाची बाजू घेणे, भुकेल्याला अन्न देणे आणि दुःखी मनाला आधार देणे, यापेक्षा मोठी ईद कोणती? याच माणुसकीच्या प्रकाशात ईद-ए-मिलाद साजरा झाला, तर तो केवळ धार्मिक उत्सव राहणार नाही; तो म णसाला माणसाशी जोडणारा सामाजिक संकल्प बनेल. ईद-ए-मिलादचा खरा संदेश एकच, धम र्चि ओळख कपड्यांत किंवा घोषणांत नाही, तर ती माणुसकीच्या आचरणात दिसली पाहिजे. ईद-ए-मिलादच्या पवित्र पर्वानिमित्त सर्व म ुस्लिम बांधवांना मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!

**– प्रविण बागडे, नागपूर**

### सामाजिक संस्थांना निधी देताना विश्वास, पारदर्शकता आणि गुणवत्तेचा समतोल साधण्याची गरज

# CSR निधीवर सरकारी नियंत्रण नव्हे, गुणवत्तेवर आधारित पारदर्शक व्यवस्था हवी

CSR निधीच्या व्यवस्थापनासाठी राज्यस्तरीय प्राधिकरण निर्माण करण्याच्या चर्चा सध्या सुरू आहेत. CSR निधीचा गैरवापर होऊ नये, निधी योग्य संस्थांपर्यंत पोहोचावा आणि त्याचा अपेक्षित सामाजिक परिणाम साधला जावा, ही चिंता निश्चितच रास्त आहे. मात्र या समस्येवरील उपाय म्हणून उडठ निधीचे संपूर्ण नियंत्रण सरकारी यंत्रणेकडे देणे हा कितपत शाश्वत पर्याय ठरेल, यावर गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे.

CSR हा केवळ सरकारी निधी नाही. उद्योगजगताच्या सामाजिक उत्तरदायित्वातून निर्माण होणारा हा निधी सम ाजातील विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या सक्षम, प्रामाणिक आणि परिणामकारक संस्थांपर्यंत पोहोचणे अपेक्षित आहे. त्यामुळे प्रश्न निधी कोणाच्या ताब्यात ठेवायचा हा नसून निधी योग्य संस्थेला, योग्य प्रकल्पासाठी आणि योग्य पद्धतीने मिळेल याची विश्वासार्ह व्यवस्था कशी निर्माण करायची, हा आहे.

सरकारकडे सर्व अधिकार केंद्रीत करण्याऐवजी कायद्याच्या चौकटीत राहून स्वतंत्र, पारदर्शक आणि गुणवत्ताधारित व्यवस्था निर्माण करता येऊ शकते.

गुणवत्ताधारित CSR व्यवस्थेचा प्रस्ताव

यासाठी राज्यस्तरावर स्वतंत्र NGO Credit Rating Com{any स्थापन करण्याचा विचार करता येईल. ही संस्था Section 8 Company म्हणून कार्यरत असावी आणि तिच्या कामकाजासाठी संबंधित नियामक चौकटीतील आवश्यक मान्यता व नियमांचे पालन बंधनकारक असावे. तिचे काम CSR निधी देणे किंवा सरकारी नियंत्रण करणे नसून सामाजिक संस्थांची आर्थिक शिस्त, प्रशासन, पारदर्शकता, प्रकल्प व्यवस्थापन, परिणामकारकता आणि कायद्याचे पालन या निकषांवर स्वतंत्र मूल्यांकन करणे असावे.

CSR निधीसाठी पात्र होऊ इच्छिणाऱ्या संस्थांसाठी हे Credit Rating घेणे अनिवार्य करता येईल. मात्र ही संपूर्ण व्यवस्था डेलळरश्र डींलज्ञ एुलहरपसश किंवा तत्सम बाजारव्यवस्थेशी स्वतंत्र ठेवणे आवश्यक आहे. उद्देश सामाजिक संस्थांचे मूल्यांकन करणे हा असेल; त्यांना आर्थिक बाजारपेठेत आणणे हा नव्हे.

रेटिंग मिळाल्यानंतर त्याचे प्रमाणपत्र संबंधित छत्रꣳज च्या उडठ प्रस्तावासोबत जोडणे बंधनकारक करता येईल. त्यामुळे उडठ देणाऱ्या कंपन्यांना संस्थेच्या विश्वासार्हतेचा स्वतंत्र आधार मिळेल.

'अ-इ-उ-ऊ' रेटिंग आणि निधी वितरण

रेटिंगच्या आधारे संस्थांचे वर्गीकरण करता येईल. उदाहरणार्थ, अ आणि इ श्रेणीतील संस्थांना संबंधित कंपनीच्या आवश्यक पडताळणीनंतर मंजूर CSR निधीचा १०० टक्के निधी देण्याची तरतूद करता येईल. त्याचबरोबर रेटिंगचा खर्चही CSR खर्चाचा पात्र भाग मानता येईल.

याउलट C आणि D श्रेणीतील संस्थांना सुरुवातीला मंजूर निधीपैकी ५० टक्के निधी देऊन उर्वरित निधी संस्थेच्या प्रगतीशी जोडण्याची पद्धत स्वीकारता येईल.

या व्यवस्थेचा एक महत्त्वाचा फायदा असा होऊ शकतो की CSR कंपनीला निधी कोणत्या छत्रꣳज ला दिला, त्या संस्थेचे रेटिंग काय होते आणि कोणत्या प्रकल्पासाठी निधी दिला, ही माहिती सार्वजनिक करणे बंधनकारक करता येईल. त्यामुळे निधी वितरणात पारदर्शकता वाढेल आणि CSR कंपन्यांवरही सार्वजनिक उत्तरदायित्व राहील.

C आणि D संस्थांचे काय?

मात्र या व्यवस्थेतील सर्वांत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे C आणि ऊ रेटिंग मिळालेल्या संस्थांचे काय?

त्यांना केवळ कमी रेटिंग देऊन बाजूला करणे हा योग्य मार्ग ठरणार नाही. अनेक लहान सामाजिक संस्था प्रत्यक्ष क्षेत्रात चांगले काम करतात; परंतु त्यांच्याकडे documentation, financial management, im{act measurement किंवा governance यासाठी आवश्यक व्यावसायिक क्षमता नसू शकते.

म्हणून राज्यस्तरावर काही Mentoring Companies किंवा Mentoring Institutions निर्माण करण्याचा विचार करता येईल. या संस्थांना Rating Company सोबत अधिकृत affiliation असावे.

C आणि D रेटिंग मिळालेल्या संस्थांना संबंधित Mentoring संस्थेकडे पाठविणे बंधनकारक करता येईल. तेथे संस्थेच्या त्रुटी ओळखून governance, accounting, documentation, Project Planning, im{act assessment आणि comPliance यामध्ये सुधारणा करण्यासाठी मार्गदर्शन मिळावे.

यामुळे Rating व्यवस्था केवळ 'चांगल्या संस्थांना निधी' देणारी न राहता 'संस्थांना चांगले बनविणारी व्यवस्था' ठरू शकते.

CSR निधीतील ३० टक्के निधी मध्यम आकाराच्या संस्थांसाठी या प्रस्तावातील आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे उडठ देणाऱ्या पात्र कंपन्यांनी त्यांच्या CSR निधीपैकी किमान ३० टक्के निधी mid-size NGOs ना meritच्या आधारावर देण्याची तरतूद करणे. आज अनेकदा मोठ्या आणि परिचित संस्थांकडे उडठ निधी सहज पोहोचतो. ग्रामीण भागात, लहान शहरांत किंवा विशिष्ट सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या मध्यम आकाराच्या संस्थांना मात्र योग्य संधी मिळत नाही. अशा संस्थांची निवड करण्यासाठी स्वतंत्र Rating Company ची मदत घेता येईल. कोणत्या कंपनीने कोणत्या mid-size NGO ला किती निधी दिला, कोणत्या निकषावर निवड केली आणि त्या संस्थेचे रेटिंग काय होते, ही माहिती वेबसाइटवर सार्वजनिक करणे बंधनकारक करता येईल.

यामुळे CSR क्षेत्रात नवीन आणि सक्षम सामाजिक संस्थांसाठी संधीचे दार खुले होईल.

खर्चाचा भार NGO वरच का?

Rating आणि Mentoring या दोन्ही प्रक्रिया संस्थांच्या गुणवत्तावाढीसाठी आवश्यक असतील. त्यामुळे त्यांचा संपूर्ण खर्च NGO वर टाकणे योग्य ठरणार नाही.

या सेवांच्या शुल्कातील ५० टक्के भाग अनुदानित करण्याची तरतूद करता येईल. मात्र ज्या संस्थेला CSR निधी प्रत्यक्ष मिळाला आहे, तिला हे अनुदान देण्यात येऊ नये. त्यामुळे मर्यादित सार्वजनिक संसाधनांचा वापर खरोखर निधी मिळविण्यासाठी संघर्ष करणाऱ्या संस्थांच्या क्षमता वाढीसाठी करता येईल.

**या प्रस्तावाचे संभाव्य फायदे**

या व्यवस्थेमुळे CSR क्षेत्रात काही म हत्त्वाचे बदल घडू शकतात. पहिला फायदा म्हणजे निधीचे सरकारी केंद्रीकरण टाळता येईल. सरकारची भूमिका नियामक, निरीक्षक आणि धोरणनिर्माता अशी राहू शकते.

दुसरा फायदा म्हणजे स्वतंत्र मूल्यांकनामुळे NGO ची विश्वासार्हता वाढेल. चांगले काम करणाऱ्या संस्थेला आपली गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी एक वस्तुनिष्ठ प्रमाणपत्र उपलब्ध होईल.

तिसरा फायदा म्हणजे CSR कंपन्यांचा निर्णय अधिक माहितीपूर्ण होईल. केवळ ओळख, संपर्क किंवा प्रसिद्धीवर आधारित निधीवाटप कमी होऊन गुणवत्तेवर आधारित निवड होण्याची शक्यता वाढेल. चौथा फायदा म्हणजे लहान व मध्यम संस्थांना संधी मिळेल. विशेषतः ग्रामीण आणि स्थानिक पातळीवर प्रभावी काम करणाऱ्या संस्थांना CSR निधीच्या मुख्य प्रवाहात आणता येईल.

पाचवा आणि सर्वांत महत्त्वाचा फायदा म्हणजे सुधारणा करण्याची संधी. C आणि D रेटिंग मिळालेली संस्था कायमची अपात्र न होता mentoringच्या माध्यमातून पुढे अ किंवा इ श्रेणीत येऊ शकेल. मात्र काही महत्त्वाचे धोकेही आहेत. या प्रस्तावाची अंमलबजावणी करताना काही मूलभूत प्रश्नांची उत्तरे शोधावी लागतील.

रेटिंग करणारी संस्था स्वतःच प्रभावशाली किंवा राजकीय दबावाखाली येणार नाही, याची खात्री कशी करणार? Rating देण्याची प्रक्रिया किती पारदर्शक असेल? Rating चुकीचे असल्यास NGO ला appeal करण्याची संधी असेल का? Rating Company आणि Mentoring Com{any यांच्यात हितसंबंधांचा संघर्ष होणार नाही यासाठी कोणती यंत्रणा असेल?

तसेच, केवळ कागदपत्रे उत्तम असणाऱ्या संस्थेला "A' आणि प्रत्यक्ष क्षेत्रात चांगले काम करणाऱ्या पण documentation कमी असलेल्या संस्थेला "C' असे होऊ नये. त्यामुळे Impact, Integrity, Governance आणि Compliance या सर्व बाबींना योग्य वजन देणे आवश्यक आहे.

Rating हा अंतिम निर्णय नसून सुधारणा आणि विश्वास निर्माण करण्याचे साधन असले पाहिजे.

सरकारची भूमिका काय असावी?

या संपूर्ण व्यवस्थेत सरकारची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे; मात्र ती निधीच्या प्रत्येक निर्णयावर नियंत्रण ठेवण्याची नसावी.

सरकारने कायदेशीर चौकट निर्माण करावी, मानके निश्चित करावीत, स्वतंत्र संस्थांची म ान्यता व देखरेख करावी, पारदर्शकता आणि सार्वजनिक प्रकटीकरण अनिवार्य करावे आणि गैरव्यवहार झाल्यास कठोर कारवाई करावी.

मात्र कोणत्या NGO ला CSR निधी द्यायचा, हे प्रत्येक प्रकरणात सरकारी कार्यालयाने ठरविण्याऐवजी नियम, स्वतंत्र Rating, कंपनीची due diligence आणि सार्वजनिक transparency यांच्या आधारे निर्णय होऊ द्यावा.

CSR सुधारण्याचा खरा मार्ग

CSR निधीचा गैरवापर थांबविणे आवश्यकच आहे. पण त्यासाठी सर्व निधी सरकारी ताब्यात घेणे हा एकमेव पर्याय असू शकत नाही. नियमन सरकारचे, मूल्यांकन स्वतंत्र संस्थेचे, निर्णय CSR कंपनीचा, काम NGO चे आणि माहिती जनतेसाठी खुली – अशी जबाबदाऱ्यांची स्पष्ट विभागणी असलेली व्यवस्था अधिक शाश्वत ठरू शकते.

CSR क्षेत्रात विश्वास निर्माण करण्यासाठी नियंत्रणापेक्षा विश्वसनीयता, केंद्रीकरणापेक्षा पारदर्शकता आणि केवळ निधीवाटपापेक्षा गुणवत्ता व परिणामकारकता महत्त्वाची आहे.

म्हणूनच राज्यस्तरीय CSR प्राधिकरणाच्या प्रस्तावावर निर्णय घेण्यापूर्वी एक व्यापक पर्यायी मॉडेल म्हणून NGO Credit Rating + Mentoring + Merit-based CSR Allocation + Mandatory Public Disclosure या चौकटीवर सार्वजनिक चर्चा होणे गरजेचे आहे.

कारण अंतिम उद्देश CSR निधी कोणाच्या ताब्यात राहतो हा नसून – समाजासाठी प्रामाणिकपणे काम करणाऱ्या सक्षम संस्थेपर्यंत योग्य निधी पोहोचतो का, आणि त्या निधीतून अपेक्षित सामाजिक परिणाम निर्माण होतो का, हा असला पाहिजे.

**– ग्रामायण अध्ययन गट**

# अनु.जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी महाडीबीटी २.० अर्ज प्रक्रिया सुरू; नवीन 'महाआयडी' अनिवार्य; अर्ज प्रलंबित न ठेवण्याच्या महाविद्यालयांना सूचना

छत्रपती संभाजीनगर, दि. २४ (प्रतिनिधी) - अनुसूचित जाती (SC) प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्ती योजनांचे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता ऑनलाइन अर्ज भरण्याची प्रक्रिया महाडीबीटी २.० (MahaDBT 2.0) या नवीन प्रणालीवर सुरू करण्यात आली आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांचा नवीन महाआयडी करणे अनिवार्य असून कोणत्याही परिस्थितीत पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज प्रलंबित ठेवू नये असे निर्देश संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांना देण्यात आले आहेत,असे सहायक आयुक्त डॉ. अनिता राठोड यांनी कळिवले आहे.

**नवीन 'महाआयडी' आवश्यक**

महाडीबीटी २.० पोर्टलवर नोंदणी करण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांना नवीन महाआयडी (Maha ID) तयार करणे बंधनकारक आहे. मागील पोर्टलवरील युझर आयडी अथवा पासवर्डची आवश्यकता राहणार नाही.

विद्यार्थ्यांनी आधार क्रमांकाच्या आधारे नवीन महाआयडी तयार करावा. आधारशी संलग्न पत्ता, मोबाईल क्रमांक, ई-मेल तसेच बँक खात्याची माहिती अचूक व अद्ययावत असल्याची खात्री करावी.

अर्ज करताना जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, अधिवास प्रमाणपत्र, शैक्षणिक गुणपत्रके तसेच योजनेसाठी आवश्यक अन्य कागदपत्रे स्पष्ट पीडीएफ (PDF$) स्वरूपात अपलोड करावीत. नवीन (F$resh) तसेच नूतनीकरण (R>enewal) अशा दोन्ही प्रकारच्या अर्जांसाठी नवीन महाआयडी अथवा आधार आधारित लॉगिन आवश्यक आहे. नूतनीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांनी लॉगिननंतर 'माझा अर्ज नूतनीकरण करावा' हा पर्याय निवडावा.

भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत संबंधित महाविद्यालयाकडून शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस शिक्षण शुल्क घेतले जात नसल्याने केंद्र शासनाचा हिस्सा विद्यार्थ्यांच्या खात्यात प्राप्त झाल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांनी शिक्षण शुल्काची रक्कम महाविद्यालयास अदा करावी.

**महाविद्यालयांसाठी केवळ प्राचार्य लॉगिन -** महाडीबीटी २.० प्रणालीमध्ये महाविद्यालयासाठी आता केवळ प्राचार्यांचे एकच लॉगिन उपलब्ध राहणार असून, लिपिक लॉगिन बंद करण्यात आले आहे. लॉगिन किंवा पासवर्डसंदर्भात अडचण असल्यास संबंधित महाविद्यालयाने आपल्या शैक्षणिक विभागाशी संपर्क साधावा.

महाविद्यालयांनी पोर्टलवर आपले प्रोफाइल तपासून अभ्यासक्रमनिहाय निश्चित करण्यात आलेली शुल्क रचना (Fee Structure) तातडीने अद्ययावत करावी. पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज कोणत्याही परिस्थितीत प्रलंबित ठेवू नयेत. विहित म ुदतीत अर्ज मंजूर करून पुढे पाठविण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित प्राचार्यांची राहील.

**असा भरावा ऑनलाइन अर्ज**

विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर "https:// mahadbt2.maharashtra. gov.in" या पोर्टलला भेट द्यावी. पोर्टलवरील लॉगिन टॅबमध्ये 'नागरिकांसाठी लॉगिन' अथवा 'महाआयडीशिवाय प्रवेश करा' या पर्यायाचा वापर करून आधार आधारित लॉगिन करता येईल. आधारशी संलग्न मोबाईल क्रमांकावर प्राप्त होणाऱ्या ओटीपीद्वारे लॉगिन प्रक्रिया पूर्ण करावी.

लॉगिननंतर पात्रतेसंबंधी आवश्यक माहिती अद्ययावत केल्यानंतर लागू असलेल्या विभागनिहाय योजनांची यादी उपलब्ध होईल. संबंधित योजनेसम ोरील 'पहा' या पर्यायावर क्लिक केल्यास योजनेचा संपूर्ण तपशील पाहता येईल. त्यानंतर "Apply' या पर्यायावर क्लिक करून वैयक्तिक माहिती, चालू व मागील शैक्षणिक तपशील आणि आवश्यक कागदपत्रे भरून अर्ज ऑनलाइन सादर करावा. अर्जाची प्रत प्रिंट अथवा पीडीएफ स्वरूपात जतन करून ठेवावी.

जात, प्रवर्ग, महाराष्ट्रातील रहिवास, दिव्यांगत्व, कौटुंबिक उत्पन्न आदी माहिती पोर्टलवर काळजीपूर्वक व अचूक भरावी.

**शुल्क आकारणी नाही**

महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना म हाडीबीटी २.० पोर्टलवर ऑनलाइन नोंदणी व अर्ज भरण्यासाठी आवश्यक सहकार्य करावे. अनुसूचित जाती प्रवर्गातील कोणत्याही पात्र विद्यार्थ्याकडून प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची रक्कम घेऊ नये, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

तसेच महाविद्यालयाचे नाव, मान्यताप्राप्त अभ्यासक्रम, अभ्यासक्रमाचा कालावधी, अभ्यासक्रमनिहाय प्रवेश क्षमता, महाविद्यालय व अभ्यासक्रमांच्या मान्यतेचे आदेश आणि शुल्क रचना आदी माहिती पोर्टलवर मॅप करण्यासाठी संबंधित संचालनालय, विद्यापीठ, परिषद अथवा शुल्क नियामक प्राधिकरण (F$R>A) यांच्यामार्फत आवश्यक कार्यवाही करावी.

महाडीबीटी २.० संदर्भातील अधिक माहितीसाठी ०२२-४९१५०८०० / १८००१०२५३११ या क्रमांकांवर अथवा hel{desk@mahadbt.gov.in या ई-मेलवर संपर्क साधता येईल. तांत्रिक किंवा प्रशासकीय तक्रारींसाठी संबंधित लॉगिनमधून स्क्रीनशॉटसह ऑनलाइन तक्रार नोंदविण्याची सुविधाही उपलब्ध आहे.

# मुख्यमंत्री सहाय्यता निधी-टाटा ट्रस्टच्या करारातून 'रूग्णांना' दिलासा

## पहिल्याच करारातून ८९.६० लाखांची मदत

मुंबई, दि. २५ (प्रतिनिधी) - यकृत प्रत्यारोपण, कर्करोग आणि मेंदूवरील शस्त्रक्रिया यांसारख्या महागड्या उपचारांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि टाटा ट्रस्ट यांच्यात करण्यात आलेला पहिलाच सामंजस्य करार राज्यातील गरजू रुग्णांसाठी दिलासादायक ठरत आहे. या करारामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना वेळेत उपचार मिळत असून रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबियांमध्येसमाधानाचीभावनानिर्माणझालीआहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि टाटा ट्रस्टच्या करारानंतर अवघ्या सहा महिन्यांत राज्यातील विविध भागांतील ९ रुग्णांना ८९ लाख ६० हजार ३०१ रुपयांचे आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात आले आहे. या मदतीतून यकृत प्रत्यारोपण, कर्करोगावरील उपचार, मेंदूवरील शस्त्रक्रिया यांसारख्या अत्यंत खर्चिक उपचारांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष तसेच टाटा ट्रस्ट यांच्यामध्ये १२ फेब्रुवारी २०२६ रोजी सामंजस्य करार करण्यात आला. पहिल्यांदाच झालेल्या या कराराअंतर्गत राज्यातील १५० गरजू रुग्णांना दुर्धर आणि गंभीर आजारावर उपचारासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून गरजू रुग्णांना वेळेवर आणि प्रभावी वैद्यकीय मदत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. विशेष म्हणजे, अशाच प्रकारचे करार इतर अनेक नामांकित संस्थांसोबतही प्रक्रियेत असून ते लवकरच पूर्णत्वास येणार आहेत. त्यामुळे राज्यातील अधिकाधिक गरजू रुग्णांना दिलासा मिळण्यास मदत होणार आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या माध्यमातून शासन, सामाजिक संस्था आणि आरोग्य क्षेत्र यांच्यातील समन्वय अधिक प्रभावी करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या उपक्रमामुळे आर्थिक अडचणींमुळे उपचारांपासून वंचित राहणाऱ्या रुग्णांना नवे जीवन मिळण्यास मदत होत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली हा सामंजस्य करार करण्यात आला. याच धर्तीवर इतरही अनेक नामांकित संस्थांसोबत सामंजस्य करार करण्याची प्रक्रिया सुरू असून, त्यातून राज्यातील अधिकाधिक गरजू रुग्णांना उपचारासाठी आर्थिक मदत उपलब्ध होणार आहे. पैशांअभावी कोणत्याही रुग्णाचा उपचार थांबू नये, या उद्देशातून मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष सातत्याने कार्यरत आहे. गरजू रुग्णांनी अधिक माहितीसाठी १८०० १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

# इमाव, विमाप्र,विजा,भज प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन प्रवेश

छत्रपती संभाजीनगर, दि. २५ (प्रतिनिधी)- इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना' तसेच भ.ज.-क प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी 'पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयंम योजना' अंतर्गत व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश दिला जातो.

सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी या प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरावे,असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक दयानंद कोकरे यांनी केले आहे.

या योजनांसाठी ऑनलाइन अर्ज करण्याचा पर्याय दि. १२ ऑगस्ट २०२६ पासून ऑनलाइन पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांमध्ये प्रथम वर्ष किंवा थेट द्वितीय वर्षात प्रवेश घेऊन शिक्षण घेत असलेल्या पात्र विद्यार्थ्यांनी 'ऑनलाइन अर्ज पोर्टल' https:// hmasnew.mahait.org या संकेतस्थळाला भेट देऊन आवश्यक कागदपत्रांसह परिपूर्ण अर्ज ऑनलाइन सादर करावा. 'ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना' ही इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती (भज-क प्रवर्ग वगळून) आणि विशेष मागास प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांसाठी असून, 'पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयंम योजना' ही केवळ भज-क प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांसाठी आहे.

जिल्ह्यातील पात्र विद्यार्थ्यांनी योजनेचा लाभ घेण्यासाठी विहित प्रक्रियेनुसार ऑनलाइन अर्ज सादर करावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक दयानंद कोकरे यांनी केले आहे.

# सरला बेटाचा प्रमुख तीर्थस्थळ म्हणून विकास करणार -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

शिर्डी दि.२५ (प्रतिनिधी)- तीर्थस्थळ म्हणून सरला बेटाच्या सर्वांगीण विकासावर भर देण्यात येत असून सर्व विकासकामे पूर्ण झाल्यावर सरला बेट महाराष्ट्रातील भाविकांसाठी आध्यात्मिक ऊर्जा केंद्र असेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. सरला बेट विकासाचा आराखड्याच्या माध्यमातून सभागृह, रस्ते, पूरसंरक्षण आणि सौरऊर्जा यासह विविध कामे सुरू करण्यात आली असल्याची माहितीही त्यांनी दिली.

अखंड हरिनाम सप्ताहाच्या काल्याच्या कीर्तनानिमित्त आयोजित सोहळ्यात मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आमदार विठ्ठल लंघे, अमोल खताळ, आशुतोष काळे, विवेक कोल्हे, वैजापूरचे आमदार रमेश बोरनारे, महंत रामगिरी महाराज, माजी आमदार भाऊसाहेब कांबळे आदी उपस्थित होते.

सदगुरू योगीराज गंगागिरी महाराजांनी सुरू केलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या परंपरेचा उल्लेख करून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, सरला बेटावर या ठिकाणाहून समाजाला विचार आणि प्रेरणा मिळते. हरिनाम संकीर्तनामुळे दुःखाचे हरण होते, मनातील 'मी'पणा दूर होतो आणि जातीभेद विसरून सर्वजण एकत्र येतात. प्रत्येकामध्ये विठ्ठलाचे दर्शन घेण्याची भावना निर्माण होते. आजच्या जगामध्ये हरिनाम संकीर्तन समाजाला एकत्र आणणारा आणि जीवनाला सकारात्मक दिशा देणारा मोठा उपाय आहे.

भारताची संस्कृती आणि सभ्यता जगातील सर्वात जुनी असून, हजारो वर्षांपासून या भूमीवर सनातन विचार, संस्कार आणि आध्यात्माची परंपरा अखंड सुरू आहे. अनेक आक्रमणे झाली तरी आपल्या विचारांना, संस्कारांना आणि श्रद्धेला कोणीही बदलू शकले नाही. वारकरी परंपरा, गुरु परंपरा आणि हरिनामाच्या शक्तीमुळे ही संस्कृती अखंड राहिली, असे मुख्यमंत्री म्हणाले.

हरिनाम संकीर्तनात शेतकरी बांधव सहभागी होत असल्याचा उल्ल ेख करतांना मुख्यमंत्री म्हणाले, शेतकरी, वारकरी, शेतमजूर आणि समाजातील वंचित घटकांच्या विकासासाठी शासन प्रयत्न करीत आहे. शेतकरी हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा असल्याने शेतकऱ्यांना दिलेला कर्जमाफीचा शब्द पूर्ण करत साडेबारा लाख शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये आतापर्यंत कर्जमाफीची रक्कम जमा करण्यात आली असून, ५६ लाख शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचा उपक्रम सुरू आहे. दर पंधरा दिवसांनी नवीन पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करून त्यांच्या खात्यात रक्कम जमा केली जात आहे.

शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याचा निर्णय शासनाने घेतला असून, सध्या ७५ टक्के शेतकऱ्यांना दिवसा आठ तास वीज मिळत आहे. टप्प्याटप्प्याने १०० टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यात येईल. पुढील काळात वर्षभर १२ तास मोफत वीज देण्याचा निर्धाही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. शेतकऱ्यांची ५८ हजार कोटी रुपयांची थकीत वीजबिले माफ करण्याचा निर्णयही शासनाने घेतला असल्याचेही श्री.फडणवीस म्हणाले.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, अखंड हरिनाम सप्ताह हा अलौकिक सोहळा असून, या भूमीला योगीराज गंगागिरी महाराजांच्या तपश्चर्येचा आणि आशीर्वादाचा स्पर्श लाभला आहे. महंत रामगिरी महाराजांच्या अमृतवाणीतून भक्तीचा अखंड प्रवाह सुरू आहे. हरिनाम सप्ताह हा केवळ धार्मिक सोहळा नसून समाजाला एकत्र आणणारा, भक्ती आणि संस्कारांची ऊर्जा देणारा सोहळा आहे. गंगागिरी महाराजांनी सुरू केल ेली १७९ वर्षांची ही परंपरा आजही मोठ्या श्रद्धेने पुढे सुरू आहे. या सप्ताहामुळे संपूर्ण परिसरात भक्ती, प्रसन्नता आणि मांगल्याचे वातावरण निर्माण झाले आहे. 'गावची एकी तर देवाची कृपा नक्की' याचा प्रत्यय या सप्ताहातून येत असून, पंचक्रोशीतील नागरिकांचे ऐक्य येथे दिसून येत आहे, असे श्री. शिंदे यांनी सांगितले. शेतकरी आणि महिलांसाठी शासनाच्या विविध योजनांचा उल्लेख करत ते म्हणाले, मुख्यमंत्री माझी ल ाडकी बहीण योजना पुढेही सुरू राहील. प्रधानमंत्री शेतकरी सन्मान योजनेसोबत राज्य शासनाने नमो शेतकरी सन्मान योजना सुरू केली आहे. शासनाच्या तिजोरीवर पहिला अधिकार बळीराजाचा आहे, अशी शासनाची भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले. कर्जमाफीच्या दुसऱ्या टप्प्यात सहा लाख शेतकऱ्यांच्या खात्यात पाच हजार कोटी रुपये जमा करण्यात आल्याचेही श्री.शिंदे यांनी नमूद केले.

# जैन टॅग आयोजित 'पार्श्वनाथ चालीसा नाईट'चा भव्य सोहळा उत्साहात संपन्न



मुंबई, दि. २५ (प्रतिनिधी) - जैन टॅग सोशल ग्रुपच्या वतीने आयोजित अनोख्या धार्मिक उपक्रमाला हजारो भाविकांची उत्स्फूर्त उपस्थिती होती यावेळेस आचार्य विनम्रसागरजी महाराज याचा मुखाने चालीसा प्रारंभ केली

हिराकाका प्रागन येथे जैन टॅग सोशल ग्रुपच्या वतीने 'पार्श्वनाथ चालीसा नाईट' या अनोख्या व भव्य धार्मिक उपक्रम ाचे आयोजन करण्यात आले. भक्तिमय आणि आध्यात्मिक वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमाला हजारो भाविकांनी उत्स्फूर्त उपस्थिती लावत पार्श्वनाथ भगवानांच्या चालीसेचे ४० वेळा सामूहिक पठण करून धर्मलाभ घेतला. यावेळी प्रास्तविक पंचायत अध्यक्ष महावीर पाटनी यानी केले

यावेळेस महावीर ठोले प्रमोद पाडे सजय पहाडे अनिल कासलीवाल मेघा कासलीवाल आदींची उपस्थित होती

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामागे जैन टॅग सोशल ग्रुपच्या अध्यक्षा जयश्री लोहाडे उज्वला पाटनी सीमा बडजाते यांच्या अथक परिश्रमांचे विशेष योगदान राहिले. तसेच जैन टॅगच्या संपूर्ण टीमने नियोजन, व्यवस्थापन आणि आयोजनात उत्स्फूर्त सहकार्य करत कार्यक्रम ाला भव्य स्वरूप प्राप्त करून दिले. यावेळेस ब्रम्रचारीनी दिदि यानी दिप दिपप्रज्वन केले

संगीतकार कीर्ती पाटणी व त्यांच्या टीमने सुरेल आणि भक्तिमय संगीताच्या माध्यमातून चालीसा पठणाला विशेष रंगत आणली. त्यांच्या मधुर स्वरांनी संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. यावेळी वेरूळ जैन गुरुकुलातील मुलाची विषेश उपस्थित होती हजारो भाविकांनी एकाच लयीत, एकाच भक्तिभावाने ४० वेळा चालीसेचे पठण करणे हा या सोहळ्याचा विशेष आणि अविस्मरणीय क्षण ठरला. प्रथमच अशा स्वरूपाचा भव्य 'चालीसा नाईट' उपक्रम आयोजित करण्यात आला, ही या कार्यक्रमाची विशेष उपलब्धी ठरली. श्रद्धा, संगीत, सामूहिक भक्ती आणि सामाजिक एकतेचा सुंदर संगम या माध्यमातून अनुभवायला मिळाला.

जैन टॅग सोशल ग्रुपच्या २०२६ या कार्यवर्षातील उपक्रम ांच्या अध्यक्षा जयश्री लोहाडे याचा यशस्वी वाटचालीतील हा आणखी एक महत्त्वाचा टप्पा ठरला असून, समाजहित आणि धार्मिक-सामाजिक उपक्रमांची ही यशस्वी परंपरा यापुढेही अधिक व्यापक स्वरूपात सुरू ठेवण्याचा मानस ग्रुपच्या वतीने व्यक्त करण्यात आला.

एकत्रित श्रद्धा, सामूहिक भक्ती आणि सेवाभावातून निर्माण होणारी सकारात्मक ऊर्जा हीच जैन टॅग सोशल ग्रुपची खरी ओळख आहे.

या भव्य आणि अविस्म रणीय उपक्रमाच्या यशासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व भाविक, संगीतकार, कार्यकर्ते, सहकारी आणि जैन टॅगच्या संपूर्ण टीमची परीश्रम केले.

# दीपिका पादुकोण पूर्ण कथा ऐकल्याशिवाय कधीही कोणत्याही चित्रपटासाठी कमिटमेंट करत नाहीत

एप्रिल २०२५ मध्ये दीपिका पादुकोण यांनी संदीप रेड्डी वांगा यांच्या 'स्पिरिट' या चित्रपटाचा भाग न बनण्याचा निर्णय घेतला होता. ऑगस्ट २०२६ उजाडला आहे, तरीही कोणत्या ना कोणत्या कारणामुळे या प्रकरणाची चर्चा अजूनही सुरू आहे. पॅन-इंडिया चित्रपटातून दीपिका बाहेर पडल्यानंतर मोठा वाद निर्माण झाला होता. दिग्दर्शकाने सोशल मीडियावर आरोप केले होते आणि इंडस्ट्रीमध्ये कलाकारांच्या कामाच्या तासांवरूनही चर्चा रंगली होती. याच आठवड्यात पुन्हा एकदा हा वाद चर्चेत आला, जेव्हा चित्रपट दिग्दर्शकाचे भाऊ प्रणय यांनी दावा केला की, दीपिका यांनी चित्रपट सोडण्यामागील एका कारणामध्ये प्रॉफिट शेअरची मागणीही होती. आता या संपूर्ण घटनाक्रमाशी जवळून संबंधित असलेल्या एका सूत्राकडून दीपिका यांनी हा चित्रपट का केला नाही, यामागची आणखी एक बाजू समोर आली आहे.

*घटनाक्रमाशी संबंधित सूत्राने सांगितले,* ङ्गदीपिका पादुकोण त्यांच्या आयुष्यात संदीप रेड्डी वांगा यांना केवळ एकदाच भेटल्या आहेत. एवढेच नाही, तर या भेटीसाठी दिग्दर्शक तब्बल एक तास उशिरा पोहोचले होते! दीपिका यांनी मात्र त्यानंतरची संपूर्ण भेट व्यावसायिक पद्धतीने पूर्ण केली. या भेटीदरम्यान चित्रपटाबद्दल केवळ एकच ओळ सांगण्यात आली होती. त्यांना चित्रपटाची संपूर्ण कथा सांगण्यात आली नव्हती. दीपिका पूर्ण कथेचे नरेशन मिळाल्याशिवाय कोणत्याही प्रोजेक्टसाठी कधीही कमिटमेंट करत नाहीत. त्यामुळे सुरुवातीपासूनच 'स्पिरिट' हा त्यांच्या विचारात असलेला प्रोजेक्ट नव्हता.ङ्घ

सूत्राने पुढे सांगितले की,* दीपिका यांना या दिग्दर्शकासोबत काम करण्यात कोणतीही इच्छा नाही. सूत्राने म्हटले, ङ्गसंदीप रेड्डी वांगा हे असे दिग्दर्शक आहेत, ज्यांच्यासोबत दीपिका पादुकोण कधीही काम करणार नाहीत, कारण महिलांबाबत त्यांचा दृष्टिकोन पुरुषप्रधान आहे. हे केवळ त्यांच्या ऑफ-स्क्रीन व्यक्तिमत्त्वातच नाही, तर त्यांच्या चित्रपटांमध्येही स्पष्टपणे दिसून येते.

दीपिका पादुकोण गेल्या वर्षी प्रभास स्टारर 'स्पिरिट'साठी संदीप रेड्डी वांगा यांच्यासोबत चर्चेत होत्या. मात्र, एप्रिलमध्ये दीपिका यांनी हा प्रोजेक्ट सोडल्याची बातमी समोर आली. रिपोर्ट्सनुसार, आई झाल्यानंतर अभिनेत्रीने दररोज ठरावीक ८ तास काम करण्याची मागणी केली होती, जी चित्रपटाच्या प्रोडक्शन टीमने मान्य केली नाही. 'कल्कि २८९८ एडी'च्या निर्मात्यांनीही एका पोस्टद्वारे सिक्केलमधून दीपिका बाहेर पडल्याची माहिती दिली होती. त्यानंतर प्रोफेशनलिझम, कामाच्या तासांची मर्यादा आणि बिग बजेट चित्रपटांमध्ये कलाकारांच्या मानधनाबाबत ऑनलाइन चर्चा रंगली होती.

दीपिकाच्या जागी तृप्ती डिमरीला चित्रपटात घेण्यात येणार असल्याच्या बातम्या समोर आल्यानंतर, दीपिका काही इंटिमेट सीन्सबाबत सहज नव्हत्या आणि त्याम ुळे त्यांनी चित्रपट सोडल्याचा दावा करण्यात आला. याच काळात दिग्दर्शक संदीप रेड्डी वांगा यांनी ट्विटरवर दीपिकाकडे अप्रत्यक्षपणे निर्देश करत एक नाराजी व्यक्त करणारी पोस्ट शेअर केली होती. मे २०२५ मध्ये त्यांनी लिहिले होते, ङ्गजेव्हा मी एखाद्या अभिनेत्याला कथा ऐकवतो, तेव्हा मी त्याच्यावर १०० टक्के विश्वास ठेवतो. आमच्यात एक न बोललेला छऊअ (नॉन-डिस्क्लोजर ॲग्रीमेंट) असतो. पण असे करून तुम्ही त्या व्यक्तीला 'ऊखडउङजडएऊ' केले, जी व्यक्ती तुम्ही आहात.... एका तरुण अभिनेत्याला कमी लेखणे आणि माझ्या कथेतून त्याला बाहेर करणे? तुमचा फेमिनिझम हाच आहे का?ङ्घ

याच आठवड्यात संदीप रेड्डी वांगा यांचे भाऊ प्रणय यांनी दीपिका यांनी 'स्पिरिट' सोडण्यामागे चित्रपटाच्या नफ्यातील १० टक्के वाटा मागितल्याचेही कारण असल्याचा दावा केल्यानंतर हा वाद पुन्हा वाढला. एनटीव्ही तेलुगूशी बोलताना प्रणय रेड्डी वांगा म्हणाले, ङ्गकारणं तीच आहेत, जी यापूर्वी सांगितली गेली आहेत. एक कारण मानधनाचे होते आणि दुसरे टाइमिंगचे. याशिवाय आणखी काही कारणेही आहेत. त्यानंतर लगेचच गोष्टी मर्यादेपलीकडे गेल्या. पाहा, त्या काहीही मागू शकतात. आम्ही देण्यास तयार असू तर देऊ शकतो. पण आमच्यासाठीही त्याचे गणित जुळणे आवश्यक आहे. आम्हाला वाटले की हे आम च्यासाठी योग्य ठरत नाही. त्यामुळे आम्ही इतर पर्यायांचा विचार केला. आम्ही इतर पर्याय शोधण्यास सुरुवात



करताच त्यांनी सर्व काही लीक करण्यास सुरुवात केली.ङ्घ

शुक्रवारी दीपिका यांनी इंस्टाग्रामवरील एका पोस्टला लाईक केले. या पोस्टमध्ये संदीप आणि प्रणय यांच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. या पोस्टमध्ये अभिनेत्रीचे कौतुक करताना म्हटले होते की, त्यांनी इंडस्ट्रीमध्ये पुरुष कलाकारांना सामान्यतः मिळणाऱ्या गोष्टींचीच मागणी केली होती.

यानंतर तृप्ती डिमरीला प्रभाससोबत चित्रपटाच्या फीमेल लीडच्या भूमिकेसाठी कास्ट करण्यात आले. दोघांचा फर्स्ट लूक २०२६च्या नववर्षाच्या दिवशी रिलीज करण्यात आला होता. या चित्रपटात विवेक ओबेरॉयदेखील प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत. 'स्पिरिट' हा चित्रपट ५ मार्च २०२७ रोजी रिलीज होणार आहे.

दरम्यान, दीपिका पादुकोण यांच्याकडे सध्या दोन प्रोजेक्ट्स आहेत. डिसेंबरमध्ये रिलीज होणाऱ्या 'किंग' या चित्रपटात त्या शाहरुख खानसोबत पुन्हा स्क्रीन शेअर करताना दिसणार आहेत. त्यानंतर त्या एटली यांच्या 'राका' या चित्रपटात अल्लू अर्जुनसोबत दिसणार असून, हा चित्रपट पुढील वर्षी रिलीज होणार आहे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक

लोकविजय

(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)

हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.

**: संपादक :**

**राजेंद्र पांडुरंग रांजणीकर**

मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५

e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.

(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# राजेंद्र दाते पाटील यांचे अन्न त्याग उपोषण स्थगित; मुख्यमंत्र्या सोबत कायदेशीर आरक्षण बाबीवर बैठक होणार!

छत्रपती संभाजीनगर दि.२५ (प्रतिनिधी)- शाश्वत मराठा आरक्षणासह इतर महत्वाच्यामागण्यां साठी मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने बेमुदत अन्नत्याग उपोषणाला बसलेले ज्येष्ठ अभ्यासक डॉ.राजेंद्र दाते पाटील यांनी सोमवारी सोळाव्या दिवशी सांयकाळी सहा वाजता अन्न त्याग आंदोलन उपोषण स्थगित केले.जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर आणि त्यांच्या मध्यस्थीने डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी अन्नत्याग आंदोलन उपोषण स्थगित केले आहे.

छत्रपती संभाजीनगर येथे गेली १६ दिवसा पासुन मराठा आरक्षण व इतर महत्वपूर्ण मागणी साठी मराठा आरक्षणाचे जेष्ठ अभ्यासक व न्यायाल यातील मराठा समाजाचे वतीने असलेले मुख्य हस्तक्षेप याचिकाकर्ते डॉ राजेंद्र दाते पाटील यांचे अन्नत्याग आंदोलन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने योग्य ते शासनादेश काढुन आणि ङकायदेशीर व घटनात्मक आरक्षणा बाबत त्यांनी तयार केलेले पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनङमधील सूचनावर निर्णय घेण्यासाठी मुंबईत कायदा-अर्थ-महसुल विभाग यांचे सोबत मुख्यमंत्र्यांचे उपस्थितीत बैठक घेण्याचे मान्य करण्यात आल्यामुळे अन्न त्याग आंदोलन उपोषण तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे.

सुभाष दादा जावळे,रमेश केरे,राहुल पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेकडो आंदोलक समन्वयकांनी मुंबईत जोरदार ठिय्या आंदोलन करून प्रशासनास सैरभैर केले.

मुंबईत मंत्री शिवेंद्रराजे भोसले,मंत्री शंभूराजे देसाई, मुख्यमंत्री यांचे कडे मुख्य सचिव श्रीकर परदेशी यांचे कडे निवेदन व सातत्याने अन्नत्याग आंदोलना दरम्यान मुंबईचे रामचंद्र शेडगे.प्रशांत भोसले, सूर्याजी सोनुवले, सुभाष पाटील,अनिल सुर्वे, सदाशिव बानुगडे (दाजी), संतोष शेजवळ,मारुती देसाई,राकेश वासुदेव पांडुरंग रोडे, सुभाष देसाई, दिनेश पवार,शैलेश शिंदे सुशील निकम, विवेक शिंदे आदिनी प्रचंड परिश्रम घेतले.

हैद्राबाद गॅझेटीयर मधील त्रुटी- ज्यांच्या कडे पुरावे असतील व वंशावळ जुडत असतील ते सर्व कुणबी म्हणुन पात्र ठरतील परंतु ज्या मराठा समाज बांधवा कडे या पैकी काहीच नाही त्यांचे काय ? यावर अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांचा आरक्षण मिळणार नाही तो पर्यंत पादत्राणे न घालण्याचा संकल्प व अनवानी लढा, आरक्षणा वरील तोडगा प्राभावशाली मांडणी करून दडलेली सत्यता पुढे आणण्यात मोलाची भूमिका निभावली.

सहा कोटी मराठा समाजाचा आरक्षणाचा विषय आता कायदेशीर व घटनात्मक दृष्ट्या मार्गी लागण्याचे दार उघडले असुन जीवाचा आटा पीटा करून देशातील मराठा आरक्षणाचे सर्वाधीक जास्त दिवसांचे अन्नत्याग उपोषण आंदोलन करणारे जेष्ठ अभ्यासक डॉ.राजेंद्र दाते पाटील यांचे सर्व स्तरातून विशेष आभार व अभिनंदन होत असुन या कामी त्यांना प्रत्यक्ष सहकार्य केल्याबद्दल संभाजी नगर टीम मराठा क्रांती मोर्चा, ठोक मोर्चा विविध मराठा संघटना, विविध धर्मीय नेते, पदाधिकारी, प्रशासन आणि मुंबईतील टीमने उपसमिती च्या अनेक मंत्र्यांना भेटून विशेष प्रयत्न केल्याबद्दल विशेष अभिनंदन होत असुन मराठा आरक्षणाची लढाई ही एकट्याचे नसून समाजातील प्रत्येक बांधवाची आहे म्हणुन

प्रत्येकाने खारीचा वाटा उचलला तरच सर्व काही शक्य होऊ शकते अशी लोकभावना निर्माण झाली असुन गेल्या १६ दिवसां पासून आरक्षणाचे अभ्यासक जेष्ठ डॉ राजेंद्र दाते पाटील विभागीय आयुक्तालया समोर उपोषण मंत्री गिरीश महाजन यांनी जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांना आश्वासन दिले की, प्रकृती सुधारल्या नंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत त्यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाची मुंबईत समक्ष बैठक




घेण्यात येईल. तसेच विभागीय स्तरावरील मागण्यांवर विभागीय आयुक्तांकडून कार्यवाही सुरू करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. या नंतर विभागीय आयुक्तांच्या वतीने वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांनी डॉ राजेंद्र दाते पाटील यांना फळांचा रस पाजून स्थागित करण्यात आलेल्या उपोषणाची सांगता केली. यावेळी डॉ.ऋषिकेश कांबळे विनोद काकडे राजेश मुंढे, मुकुंद सोनवणे डॉ.शिवानंद भानुसे लक्ष्मणबापू शिरसाठ, योगेश शेळके धामोरीकर, सुनील कोटकर, विजय काकडे,पंडित बोर्डे, मायनोरीटी कौन्सीलचे शेख मसुद,दिलीप गायकवाड प्रा. मनोहर लोंढे ख्रिस्ती कृतीसमितीचे विजय(गुड्डू ) निकाळजे सुभाष वाघुले, शेख राउफ आबेद काद्री, ज्ञानेश्वर गायकवाड, प्रदीप नवले, अमोल साळुंके अमित जाधव,रेखा वाहटुळे, मोहनराव फोलाने, संतोष काळे, बिशप हनोख देवकाते सचिन हिवाळे,शेख जावेद, अक्षय गायकवाड, जयेश भालेराव विजय जाधव, गौरव राजपूत, रविंद्र वाहटुळे विल्सन गायकवाड,निखिल काकडे, आर्यन पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

**प्रमुख मागण्या**

मराठा-कुणबी नोंद अथवा वंशावळ नसलेल्या मराठा बांधवांना हैदराबाद गॅझेटिअरच्या आधारे कुणबी जात प्रमाणपत्रव जातवैधता प्रमाणपत्र देण्याबाबत शासनाने भूमिका स्पष्ट करावी, एसईबीसी प्रवर्गाला ओबीसी प्रमाणे शिक्षण, नोकरी, शिष्यवृत्ती, शैक्षणिक शुल्क सवलत,वयोमर्यादा वाढव शासकीय योजनांचा लाभ राजकीय आरक्षण वगळता द्यावा, आंदोलना दरम्यान दाखल झालेले गुन्हे मागे घ्यावेत, सारथी संस्थेला पाच हजार कोटी,तर स्व.अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळा ला दहा हजार कोटी रुपयांचा निधी द्यावा.प्रलंबित उमेदवारांना तातडीने नियुक्त्या द्याव्यात, तसेच कायगाव येथे एक एकर जागा व पाच कोटी रुपये डी पी आर साठी देऊन स्व काकासाहेब शिंदे मराठा हुतात्मा स्मारक उभारावे.

# आश्रमशाळांमध्ये ॲनिमिया निवारण मोहीम; 'सीएसीआर' च्या करारांतर्गत ७९ हजार ६२४ विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन तपासणी

छत्रपती संभाजीनगर दि.२५ (प्रतिनिधी)- राज्यातील शासकीय व अनुदानित आश्रमशाळा तसेच एकलव्य मॉडेल निवासी शाळांमधील विद्यार्थ्यांमध्ये ॲनिमिया (रक्तक्षय) निवारणासाठी आदिवासी विकास विभागामार्फत विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत अवघ्या दीड महिन्यात राज्यातील २०४ शाळांमधील ७९ हजार ६२४ विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन (एचबी) तपासणी पूर्ण करण्यात आली आहे.

> आदिवासी विद्यार्थ्यांचे सुदृढ आरोग्य आणि दर्जेदार शिक्षण याला विभागाचे सर्वोच्च प्राधान्य आहे. 'ॲनिमिया निवारण कार्यक्रमाच्या'माध्यमातून विद्यार्थ्यांमधील रक्तक्षयाच्या समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन युद्धपातळीवर तपासणी मोहीम हाती घेण्यात आली आहे. अवघ्या दीड महिन्यात ७९ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन तपासणी पूर्ण झाली आहे'
>
> **- लीना बनसोड,**
> आयुक्त, आदिवासी विकास विभाग

आदिवासी विद्यार्थ्यांमधील ॲनिमियाचे प्रमाण कमी करून त्यांचे आरोग्य सुदृढ राखण्याच्या उद्देशाने विभागामार्फत 'ॲनिमिया निवारण कार्यक्रम' युद्धपातळीवर राबविण्यात येत आहे. यासाठी आदिवासी विकास विभागाने 'सिटिझन्स असोसिएशन फॉर चाईल्ड राईट्स' (सीएसीआर) या संस्थेसोबत सामंजस्य करार केला आहे. या कराराअंतर्गत आश्रमशाळांमधील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या रक्तातील हिमोग्लोबिनची पातळी तपासण्यात येत आहे.

या मोहिमेत १४९ शासकीय आश्रमशाळांमधील ५५ हजार ८६८, ४८ अनुदानित आश्रमशाळांमधील २२ हजार ४२० तसेच ६ एकलव्य मॉडेल निवासी शाळांमधील १ हजार ३३६ विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली आहे. तपासणी करण्यात आलेल्यांमध्ये ३७ हजार ९१९ विद्यार्थी आणि ४१ हजार ७०५ विद्यार्थिनींचा समावेश आहे.

**नाशिक विभागात सर्वाधिक तपासणी**

नाशिक विभागातील- १०४ शाळांमधील ४१ हजार ४६९ विद्यार्थ्यांची तपासणी पूर्ण झाली आहे. यामध्ये ८० शासकीय आश्रमशाळांमधील ३१ हजार ३९३, २१ अनुदानित आश्रमशाळांमधील ९ हजार २२७ आणि ३ एकलव्य शाळांमधील ८४९ विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

ठाणे विभागातील ८१ शाळांमधील ३३ हजार ४२६ विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये ५९ शासकीय आश्रमशाळांमधील २२ हजार ५४, १९ अनुदानित आश्रमशाळांमधील १० हजार ८८५ आणि ३ एकलव्य शाळांमधील ४८७ विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

अमरावती विभागात ८ शासकीय आश्रमशाळांमधील १ हजार ८८५ आणि ३ अनुदानित आश्रमशाळांमधील १ हजार १३ अशा एकूण २ हजार ८९८ विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली आहे. नागपूर विभागातील शासकीय व अनुदानित आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांचीही तपासणी पूर्ण करण्यात आली आहे.

**एचबी कमी असलेल्या विद्यार्थ्यांना पूरक आहार**

तपासणीदरम्यान ज्या विद्यार्थ्यांच्या रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी आढळले आहे, त्यांना आवश्यक पूरक आहार उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ॲनिमियाचे वेळीच निदान करून विद्यार्थ्यांच्या आरोग्यात सुधारणा घडवून आणणे आणि त्यांचे आरोग्य सुदृढ राखणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

# महावितरणच्या प्रलंबित प्रश्नांवर २८ ऑगस्टला जिल्हास्तरीय आढावा बैठक; नागरिकांनी तक्रारी सादर करण्याचे खासदार संदिपान भूमरे यांचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर दि.२५ (प्रतिनिधी)- जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील वीजपुरवठ्याशी संबंधित विविध प्रलंबित प्रश्न, शेतकरी व नागरिकांच्या तक्रारी तसेच महावितरणच्या विविध विकासकामांचा सविस्तर आढावा घेण्यासाठी खासदार संदिपान भूमरे यांच्या अध्यक्षतेत दिनांक २८ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता महावितरण मुख्य कार्यालय, मिल कॉर्नर, छत्रपती संभाजीनगर येथे जिल्हास्तरीय आढावा बैठक आयोजित करण्यात आली आहे.

केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांतर्गत प्राप्त निधी, विविध लेखाशीर्षांतर्गत सुरू असलेली कामे, वारंवार होणारे विद्युत खंडित होणे, नवीन वीज जोडण्या, शेतकऱ्यांचे प्रलंबित वीज अर्ज, ट्रान्सफॉर्मरची क्षमता वाढविणे, भूमिगत वीजवाहिन्या तसेच अन्य तांत्रिक व प्रशासकीय विषयांचा या बैठकीत सविस्तर आढावा घेतला जाणार आहे.

सदर बैठकीत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सर्व सन्माननीय मंत्री, आमदार, जिल्हा परिषद अध्यक्ष, महापौर यांच्यासह इतर लोकप्रतिनिधी आणि महावितरणचे सर्व वरिष्ठ अधिकारी यांची उपस्थिती राहणार आहे.

महावितरणशी संबंधित समस्या व तक्रारी थेट आढावा बैठकीत मांडून त्यावर संबंधित अधिकाऱ्यांकडून कार्यवाही करून घेण्याचा प्रयत्न खासदार भूमरे यांच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. त्यामुळे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सर्व नागरिक व शेतकरी बांधवांनी महावितरणशी संबंधित प्रलंबित कामे, वीज जोडणीचे अर्ज, ट्रान्सफॉर्मरची मागणी, वारंवार वीजपुरवठा खंडित होणे, वीजवाहिन्यांशी संबंधित समस्या, वीजबिल किंवा अन्य तक्रारींची छायांकित प्रत २७ ऑगस्ट २०२६ पूर्वी खासदार संदिपान भूमरे यांच्या कार्यालयात सादर करावी अथवा sandipanbhumare@gmail.com यावर ईमेल करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील नागरिक व शेतकऱ्यांच्या वीजविषयक समस्या मार्गी लावण्यासाठी ही बैठक महत्त्वपूर्ण ठरणार असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने आपल्या प्रलंबित प्रश्नांची माहिती खासदार कार्यालयाकडे सादर करावी, असे आवाहन खासदार संदिपान भूमरे यांनी केले आहे.

# धोंडीरामसिंह राजपूत लिखित कविता संग्रह'चिंतातुर शेतकरी'आणि 'लढा'काका कोयटे यांना प्रदान

वैजापूर दि.२५ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र राज्य पतसंस्थाचे अध्यक्ष व कोपरगाव येथील समता पतसंस्थेचे चेअरमन ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांना मराठवाडा विभागाचे जेष्ठ साहित्यक तथा जेष्ठ नागरिक धोंडीरामसिंह ध राजपूत यांनी आपले दोन कविता संग्रह जे नुकतेच प्रकाशित झालेले आहेत.

१-'चिंतातुर शेतकरी'-२'लढा' ते कोयटेयांना सोमवार(ता,२४)रोजी जेष्ठ नागरिक मेळाव्यात प्रदान करून विनंती केली की,देशाचा शेतकरी अत्यंत चिंताग्रस्त आहे,निसर्ग व शासन त्यांच्या कडे दुर्लक्ष करते, तसेच महिला हा समाजातील घटक अत्यंत दुर्लक्षित आहे,अलीकडे महिला व मुलींवर सामाजिक,कौटुंबिक अन्याय व अत्याचार वाढले,यांना वाचा फुटावी हे अन्याय ,अत्याचार थांबावे यासाठी सर्व थरावर सर्वंकष प्रयत्न व्हावे यासाठी महिला व मुली याचा लढा अशा विविध घटकावरील लढे 'लढा' या काव्य संग्रहात आहेत त्यांना ही वाचा फुटावी म्हणून लिहिलेले हे दोन्ही काव्य संग्रह स्वीकारून आपण ही प्रयत्नशील असावे अशी विनंती कवी धोंडीरामसिंह राजपूत यांनी काका कोयटे यांना करून कविता संग्रह त्यांना सुपूर्द केले.

या प्रसंगी वैजीनाथ जेष्ठ नागरिक सेवा संघ अध्यक्ष प्रकाशशेठ बोथरा, आधार जेष्ठ नागरिक संघ अध्यक्ष उत्तमराव साळुंके,चैतन्य जेष्ठ नागरिक सेवा संघ अध्यक्ष साहेबराव साळुंके, व उत्कर्ष जेष्ठ महिला नागरिक सेवा संघ अध्यक्षा सौ. अंजलीताई सुरेश जोशी व शहरातिल जेष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# बेवारस मयत; ओळख पटविण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर दि.२५ (प्रतिनिधी)- येथील पंचवटी समोर उड्डाणपुलावर दि.१३ रोजी मोटार सायकल अपघातात जखमी झालेल्या इसमाचे उपचार घेतांना घाटी रुग्णालयात दि/१८ रोजी निधन झाले. या बेवारस इसमाने स्वतःचे नाव संजय बनसोडे असे सांगितले आहे. त्याची ओळख पटविण्याचे आवाहन वेदांत नगर पोलिसांनी केले आहे,.

पंचवटी समोर उड्डाणपुलावर गुरुवार दि.१३ रोजी दुपारी ३ वा ४० मि. च्या सुमारास मोटार अपघातामध्ये जखमी झालेल्या एका व्यक्तिस अंकुश मगरे यांनी घाटी रुग्णालयात दाखल केले.

दाखल केल्यावर जखमी व्यक्तीने त्याचे नाव संजय बनसोडे (वय अंदाजे ३० वर्षे) असे सांगितले. त्यानंतर तो बेशुद्ध झाला. उपचारा दरम्यान दि.१८ रोजी त्यास मयत घोषीत करण्यात आले. मयत इसमाचे कोणीही नातेवाईक वा ओळखीचे व्यक्तिंनी संपर्क केलेला नाही. त्यामुळे त्याची ओळख पटविण्याचे आवाहन वेदांत नगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांनी केले आहे.

मयताचे वर्णनः वय अंदाजे ३० वर्षे, रंग काळा-सावळा, नाक-सरळ, डोळे-खोल, केस-काळे, चेहरा लांबट, अंगात कपडे-रुग्णालयातील कपडे, उंची साधारण ५.२ फुट.

वरील वर्णनाच्या इसमाबाबत काही माहिती कळाल्यास वेदांत नगर पोलीस स्टेशनचे पोउपनि यांच्याशी अथवा ०२४०-२३५१३३३ वर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# घरातील वादातून तरुण चढला टॉवरवर; पोलिस-अग्निशमन दलाच्या प्रयत्नांनी टळला अनर्थ

छत्रपती संभाजीनगर दि.२५ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर शहरातील खवड्या डोंगरावर एकाच कुटुंबातील तिघांनी आत्महत्या केल्याची मन सुन्न करणारी घटना ताजी असतानाच, शहरात आणखी एक मोठी दुर्घटना टळली आहे. हर्सूल-सावंगी परिसरात एका तरुणाने घरातील वादातून थेट एका उंच टॉवरवर चढून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिस आणि अग्निशमन दलाने दाखवलेल्या तत्परतेमुळे आणि तासभर चाललेल्या थरारक रेस्क्यू ऑपरेशननंतर या तरुणाला सुखरूप खाली उतरवण्यात यश आले आहे. या संपूर्ण घटनेचा अंगावर काटा आणणारा व्हिडिओही आता समोर आला आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, हर्सूल-सावंगी परिसरात राहणाऱ्या एका तरुणाचा घरात काही कारणांवरून वाद झाला होता. रागाच्या भरात आणि नैराश्यातून त्याने टोकाचे पाऊल उचलण्याचा निर्णय घेतला. तो थेट परिसरातील एका उंच टॉवरवर जाऊन बसला. हा तरुण टॉवरवर चढल्याचे लक्षात येताच परिसरातील नागरिकांच्या काळजाचा ठोका चुकला. पाहता पाहता घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी उसळली.

नागरिकांनी तातडीने या घटनेची माहिती पोलिसांना दिली. घटनेचे गांभीर्य ओळखून हर्सूल पोलिस आणि अग्निशमन दलाचे पथक अवघ्या काही मिनिटांत घटनास्थळी दाखल झाले. तरुणाला खाली उडी मारण्यापासून रोखण्यासाठी पोलिसांनी त्याच्याशी संवाद साधायला सुरुवात केली. अग्निशमन दलानेही कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी खाली आवश्यक ती सर्व तयारी करून ठेवली होती.

सुमारे एक तास हा 'हाय-व्होल्टेज ड्रामा' सुरू होता. अखेर पोलिस आणि बचाव पथकाच्या अधिकाऱ्यांनी तरुणाची समजूत काढण्यात यश मिळवले आणि त्याला अतिशय शिताफीने व सुरक्षितपणे खाली उतरवले. तरुण सुखरूप खाली आल्यानंतर उपस्थित नागरिकांनी आणि पोलिसांनी मोठा सुटकेचा निश्वास टाकला.

या थरारक घटनेचे मोबाईल मध्ये चित्रण करण्यात आले असून, हा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये तरुण टॉवरच्या वरच्या भागात उभा असल्याचे आणि बचाव पथक त्याला खाली आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करत असल्याचे स्पष्ट दिसत आहे.

पोलिसांनी तरुणाला ताब्यात घेतले असून, त्याची समजूत काढण्याचे काम सुरू आहे. कौटुंबिक वादातून नैराश्यापोटी उचललेल्या या पावलामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली होती, मात्र प्रशासनाच्या तत्परतेमुळे शहरात एक मोठी जीवितहानी टळली आहे.

# भरधाव हायवाने दोन बहिणींना उडवले, एकीचा जागीच अंत

वाळूज महानगर दि.२५ (प्रतिनिधी)- शाळा सुटल्यानंतर आनंदाने घरी परतणाऱ्या दोन चिमुरड्या बहिणींवर काळाने अत्यंत क्रूर घाला घातला. शाळेच्या बसमधून उतरून घराकडे जाण्यासाठी रस्ता ओलांडत असताना भरधाव वेगाने आलेल्या एका अनियंत्रित हायवा डंपरने दोन्ही बहिणींना चिरडल्याची हृदयद्रावक घटना घडली. या भीषण अपघातात अवघ्या ७ वर्षांच्या आरुषी कृष्णा तिवारी या बालिकेचा जागीच अत्यंत विदारक अंत झाला, तर तिची १६ वर्षीय मोठी बहीण नंदिनी तिवारी ही गंभीर जखमी झाली आहे. आज, मंगळवारी (दि. २५) दुपारी चार वाजेच्या सुमारास विटावा ते एकलहेरा रस्त्यावरील गट क्रमांक २७ जवळ ही थरारक दुर्घटना घडली.

मूळचे उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथील रहिवासी असलेले कृष्णा तिवारी हे पोटापाण्यासाठी वाळूज औद्योगिक परिसरालगत एकलहेरा येथे सहकुटुंब वास्तव्यास आहेत. त्यांच्या कुटुंबात पत्नी, चार मुली व एक लहान मुलगा असा परिवार आहे. मंगळवारी दुपारी शाळा सुटल्यानंतर आरुषी आणि तिची मोठी बहीण नंदिनी या दोघी शाळेच्या बसने घरी परत आल्या. एकलहेरा शिवारातील घरासमोर बस थांबल्यानंतर दोघी बसमधून सुखरूप खाली उतरल्या. त्यानंतर बसच्या पाठीमागून त्या रस्ता ओलांडत असतानाच समोरून अतिवेगात आलेल्या एका हायवा डंपरने त्यांना जोरदार धडक देऊन चिरडले.

## (पान १ वरून)

### शासकीय आदिवासी वसतिगृहात...

येणाऱ्या अडचणींचा पाढाच वाचला होता. शासकीय आदिवसी वसतिगृहात राहण्यासाठी ३० वर्षाची जाचक वयोमर्यादा रद्द करून ती ३५ वर्षांपर्यंत वाढवण्यात यावी, अशी मागणीही तिने या कार्यक्रमात केली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रश्नी हस्तक्षेप करावा, अशी मागणी राहुल गांधी यांनी केली होती.

मांजरी येथे १० दिवसांपासून आदिवासी विद्यार्थी आंदोलनालाही बसलेले होते. त्या आंदोलनाचा संदर्भ देत ही मुलगी म्हणाली होती की, 'माझ्या हातात काही नाही. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच निर्णय घेऊ शकतात,' असे आदिवासी विकास मंत्री सांगत असल्याचा आरोप करत 'जर तुमच्या हातात काय नाही तर मग तुम्ही मंत्री कशाला झालात? राजीनामा द्या' असा संतापही या आदिवासी विद्यार्थिनीने व्यक्त केला होता. या सर्व पार्श्वभूमीवर आज झालेल्या बैठकीत शासकीय आदिवासी वसतिगृहाबाबत ५ ऑगस्ट रोजी जारी करण्यात आलेला शासन निर्णय आणि १४ ऑगस्ट रोजीच्या शासन निर्णयान्वये जारी करण्यात आलेली एकत्रित सुधारित नियमावलीच रद्द करण्यात आली आहे.

### 'आरक्षण हटाव'वरून...

राजनाथ सिंह यांनी त्यांची नावे सांगावीत,'' असा सवाल वडेट्टीवार यांनी उपस्थित केला. आरक्षणाच्या बाबतीत संविधानिक चौकट आणि न्यायालयीन निकषांचे पालन झाले पाहिजे, अशी काँग्रेसची भूमिका असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. कोणाच्या दबावामुळे किंवा राजकीय घोषणांमुळे घेतलेले निर्णय न्यायालयात टिकणार नसतील, तर त्याचा उपयोग होणार नाही, असेही त्यांनी म्हटले.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला २८ ऑगस्टपर्यंतची मुदत दिल्याबाबतही वडेट्टीवार यांना प्रश्न विचारण्यात आला. यावर त्यांनी काँग्रेसची भूमिका स्पष्ट असल्याचे सांगितले. ''जरांगे आणि सरकारमध्ये काय चर्चा होते, कोण मंत्री तिकडे जातात किंवा कोण उपोषण करतात, याच्याशी आम्हाला देणंघेणं नाही. आमची भूमिका स्पष्ट आहे. जातनिहाय जनगणना करा आणि आमच्या वाट्याचे आरक्षण आम्हाला द्या,'' असे वडेट्टीवार म्हणाले. आरक्षणाच्या प्रश्नावर जे निर्णय घेतले जातील ते संविधानाच्या आणि न्यायाच्या चौकटीत असणे आवश्यक आहे. बोगस किंवा नियमबाह्य निर्णय घेतले गेले तर ते न्यायालयात टिकणार नाहीत, असेही त्यांनी नमूद केले.

### साखरेच्या साठेबाजीवर...

कडक कारवाई करण्यात यावी, असे निर्देशही पुरवठा विभागाने दिले आहेत.

दरम्यान, देशभरात साखरेच्या दरात वाढ झाल्यानंतर सोलापुरात साखरेच्या साठेबाजीविरोधात प्रशासन सतर्क झाले असून सोलापूर जिल्हा पुरवठा विभागाकडून साखर विक्रेत्यांच्या ठिकाणी तपासणी सुरू करण्यात आली आहे. साखरेची कृत्रिम टंचाई निर्माण होऊ नये आणि साठेबाजीला आळा बसावा यासाठी जिल्हा पुरवठा विभागाने विशेष तपासणी पथकं नियुक्त केली आहेत. या पथकांकडून मोठ्या प्रमाणात साखरेची विक्री होणाऱ्या व्यवसायांच्या ठिकाणी धाड टाकून साठ्याची तपासणी केली जात आहे. दरम्यान, साखर विक्रेत्यांनी १५ दिवसांपेक्षा अधिकचा साठा करू नये, अशा स्पष्ट सूचना जिल्हा पुरवठा विभागाकडून देण्यात आल्या आहेत.

### अंगणवाडीत आहाराच्या..

कारवाई करण्यात आली होती. आता, महिला व बालविकास विभागाने बालकांच्या पोषण आहाराबाबत कडक भूमिका घेतली आहे.

महाराष्ट्रातील बालकांच्या आरोग्यामध्ये सुधारणा घडवून आणणे आणि त्यांना उत्तम पोषण पुरवणे याला राज्य शासनाने सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. अंगणवाडी केंद्रांच्या माध्यमातून बालकांना पुरवल्या जाणाऱ्या पोषण आहाराचा दर्जा उत्तम आणि सुरक्षित राहावा, यासाठी महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी संपूर्ण प्रशासनाला सतर्क राहून कडक पावले उचलण्याचे निर्देश दिले आहेत.

### देवेंद्र फडणवीसांची दिल्लीला...

विकासासाठी नाही, तर ठेकेदार आणि मंत्र्यांच्या खिशात जात आहे.'' त्यांनी एका गंभीर प्रकरणाचा दाखला देत आरोप केला की, ''७२ कोटी रुपयांचे एक कंत्राट मूळ कंपनीने दुसऱ्या कंपनीला ४५ कोटींना दिले आणि त्या कंपनीने तेच काम ३० कोटींना उपकंत्राटदाराला दिले. यातील तब्बल २७ कोटींचे कमिशन एका मंत्र्यांच्या चौधरी नावाच्या जावयाने खाल्ले आहे. या निधीचा १ टक्का जरी शिक्षणावर खर्च झाला असता, तर राज्यातील आश्रमशाळा आणि रुग्णालयांची अवस्था सुधारली असती.''

न्यायव्यवस्थेवर आणि विशेषतः सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्यावर राऊत यांनी उघड नाराजी व्यक्त केली. ''आमच्या प्रकरणात राज्यपालांची कृती चुकीची ठरवली, भरत गोगावले यांचा प्रतोद गट बेकायदेशीर ठरवला; सर्व निरीक्षणे आमच्या बाजूने नोंदवली, मात्र अंतिम निकाल आमच्या विरोधात दिला. असा अपूर्ण न्याय आम्हाला नको. न्यायाधीशांनी केवळ सल्ले देऊ नयेत, तर खुर्चीवरून थेट न्यायपूर्ण आदेश दिले पाहिजेत,'' असा टोला त्यांनी लगावला.

शिंदे आणि अजित पवार गटावर टीका करताना राऊत म्हणाले की, ''हे पक्ष म्हणजे अमित शहांची अंगवस्त्रे आहेत. त्यांना कोणतेही राज्यपाल पद मिळणार नाही. त्याऐवजी त्यांना ४ देशांचे राजदूत पद दिले जाण्याची शक्यता आहे, कारण त्यांची परदेशातील काळी संपत्ती सांभाळण्यासाठी त्यांना या पदांची गरज आहे.'' तसेच, राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार) विलिनीकरणाच्या चर्चा निव्वळ अफवा असून, महाविकास आघाडी भक्कम असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### महायुतीत स्थानिक पातळीवर...

पातळीवर निर्णय घेतला जाईल. तरीही वाद न मिटल्यास अंतिम निर्णय मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत घेतला जाईल. महामंडळांच्या अंतिम फेरबदलासाठी आणि वाटपासाठी अजून १ ते २ बैठका होण्याची शक्यता आहे. पुढील १५ दिवसांत महामंडळ वाटपावर अंतिम शिक्कामोर्तब केले जाईल अशी माहिती मिळत आहे. महामंडळ वाटपाच्या संभाव्य फॉर्म्युलावर भाजपा ४८ टक्के, शिवसेना २९ टक्के आणि राष्ट्रवादी काँग्रेसला २३ टक्के अशाप्रकारे महामंडळांचे वाटप होण्याची शक्यता आहे. कोणते महामंडळ कुठल्या पक्षाला? यावर आणखी दोन बैठका होऊन तिढा सोडविला जाणार आहे.

# शिवाजी विद्यापीठाचे काळसेकर काव्य पुरस्कार जाहीर; रवी कोरडे यांचा होणार सन्मान

छत्रपती संभाजीनगर दि.२५ (प्रतिनिधी)- शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारा सन २०२६ चा 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार' ज्येष्ठ कवयित्री प्रभा गणोरकर यांना घोषित झाला आहे. तर 'ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार' रवी कोरडे यांना जाहीर करण्यात आला आहे. नियतकालिकांच्या संपादन व लघुनियतकालिक चळवळीत सक्रीय सहभाग असणाऱ्या सतीश काळसेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा पुरस्कार देण्यात येतो. शिवाजी विद्यापीठात लवकरच पुरस्कार प्रदान सोहळा आयोजित करण्यात येईल, अशी माहिती डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली. काळसेकर कुटुंबियांच्या वतीने सतीश काळसेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिलेल्या देणगीतून काव्य क्षेत्रात मौलिक योगदान देणाऱ्या कवींना 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार' देण्यात येतो. रुपये २१,०००/- आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. तर, आश्वासक कविता लेखन करणाऱ्या तरुण कवीला 'ऋत्विज काळसेकर पुरस्काराने' सन्मानित करण्यात येते. या पुरस्काराचे स्वरूप रुपये १०,०००/- आणि सन्मानचिन्ह असे आहे. 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार' ज्येष्ठ कवयित्री व समीक्षक प्रभा गणोरकर यांना देण्यात येत आहे. प्रभा गणोरकर या मूळच्या अमरावती येथील असून मराठीतील ज्येष्ठ कवयित्री आणि समीक्षक म्हणून त्यांची साहित्यविश्वाला ओळख आहे. त्यांचे 'विवर्त', 'व्यतीत' व 'व्यामोह' हे कवितासंग्रह प्रकाशित आहेत. गणोरकर यांची कविता पुरुषी पर्यावरणात स्त्रियांच्या वाट्याला आलेल्या यातनामय आयुष्याचे अत्यंत गंभीर व संयत स्वरात केलेलं आर्त प्रकटन आहे.